# प्रकरण ३ रे

## ‘देवकाठी’ आणि ‘बिल्वपत्र’ या दोन कथासंग्रहांचा आशय आणि अभिव्यक्तिदृष्ट्या विचार

## प्रकरण ३ रे

## अनंत मनोहर यांच्या 'देवकाठी' आणि 'बिल्वपत्र' या दोन कथासंग्रहाचा आशय आणि अभिव्यक्तीदृष्ट्या विचार

**प्रस्तावना :-**

अनंत मनोहर हे मराठीतील अलीकडील एक महत्त्वाचे कथाकार आहेत. त्यांच्या कथा मानवीजीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करतात. माणसाची विविध दु:खे, समस्या, वृत्ती -प्रवृत्ती यांचे चित्रण त्यांच्या कथांतून होते. त्यांच्या कथा म्हणजे मानवी जीवनावरील भाष्यच आहे. अनंत मनोहरांच्या कथा मानवीजीवनाचे वास्तव स्वरूप उलगडून दाखवितात. त्यांच्या कथांत मानवी जीवनाबरोबर निसर्ग, प्राणिजगत यांचेही संदर्भ येतात. प्रामुख्याने त्यांच्या कथांतील जीवन हे मध्यमवर्गीय जीवन आहे. मध्यमवर्गीय माणसाची दु:खे, त्यांच्या समस्या, मध्यमवर्गातील सुशिक्षित स्त्रिया यांचे प्रश्न त्यांनी आपल्या कथांतून मांडले. त्यांच्या कथांत विविध क्षेत्रातील माणसे भेटतात. बऱ्याच कथांतून सर्वसामान्य माणसाचे कष्टप्रद जीवन रेखाटले आहे. त्यांच्या कथांत दु:ख, कारुण्य केंद्रस्थानी आहे. त्यामुळे त्यांच्या कथांतील बऱ्याच व्यक्तिरेखा आत्महत्या करताना दिसतात. त्यामुळे अनंत मनोहर यांच्या कथावाङ्मयाचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

'देवकाठी' या कथेतील नायक योगेश भोंबे हा गरीब घरातील आहे. त्याने आपल्या प्रयत्नातून त्या गरिबीवर मात करून शिक्षण घेतले. कोकणात राहणारा योगेश भोंबे नोकरीसाठी बाहेरगावी (बंगलोर) राहत होता. योगेश बँक ऑफ महाराष्ट्र, सिबा, इंडियन प्लॅस्टिक्स लिमिटेड या बड्या कंपन्यांचे इंटर्नल ऑडिट करण्याचे काम करत होता. योगेशची पत्नी माधवी हिचा योगेशला मोठा पाठिंबा होता. योगेश शिक्षण घेत असतानाही माधवीने प्रपंच अगदी चांगला सांभाळला होता.

पण माधवीचे निधन होते. या दु:खाने योगेश खचून गेला होता. योगेश आपले दु:ख विसरण्यासाठी चिपळूणला येऊन राहतो. तरीही त्यांचे दु:ख कमी होत नाही. म्हणून योगेश परत कामाला जाण्यासाठी बंगलोरला चालला होता. त्याचवेळी चिपळूण- मिरज गाडीत बापू शिंदे याच्याशी योगेशाची ओळख होते. बापूसारख्या सद्‌गुणी व्यक्तीला योगेशचे दु:ख माहीत नव्हते; पण त्याला कसले तरी दु:ख आहे हे नक्कीच कळत होते. बापू शिंदे हे वारकरी होते. योगेशने त्याचे दु:ख सांगावे म्हणून बापू म्हणतात की, ''काही दु:खं अशी असतात की, ती मुकाट्याने सोसायची असतात. मग कालांतराने त्यांची तीव्रता कमी होते. ती सह्य होतात.[१]''

बापू योगेशला मलकापूर येथे गाडी थांबल्यावर आग्रहाने चहाला घेऊन जातात. पुरी भाजीची ऑर्डर देतात. गाडीकडे परत येताना योगेशला समजाविण्याचा प्रयत्न करतात की, अनुभवाने काही गोष्टी माणसाला अधिक समजतात. देवाने दिलेला हा देह आहे तोपर्यंत त्या देहाचे देणे देऊन टाकायचे. माणसांवर संकटे येतात, दु:ख कोसळते. त्याच्याशी दोन हात करायचे असेल तर शरीर बळकट ठेवायला पाहिजे. शरीराला अन्न पाणी नाकारून कसे चालेल.

बापू हे मामलेदार कचेरीत कारकून होते. पण वडील आजारी पडल्यावर त्यांनी बापूंच्या गळ्यात माळ घातली. त्यावेळेपासून बापू वारी करत होते. योगेशला मिरजेतून गाडी मिळण्यास दोन तास वेळ होता. बापूंनी आग्रह करून योगेशला जेवायला बोलविले. जेवण झाल्यावर बापूंनी योगेशला कोणत्या दु:खात आहात असा प्रश्न विचारल्यावर योगेश म्हणतो की, ''तेच दु:ख विसरण्याचा यत्न करतोय मी.'' त्याला बापू धीर देताना म्हणतात ''होय ना ? दु:ख इतरांना सांगावं

म्हणजे ते हलकं होतं. योगेश, या भवसागरात दु:ख, संकटे जरा, मरण चुकत नाहीत कोणाला . पण आपण माणसं एकमेकांच्या दु:खात सहभागी होऊ शकतो.[२]''

बापू योगेशला सल्ला देतात की, बंगलोरला न जाता बापूंच्या बरोबर वारीला चला . निदान तेथे तरी तुम्हांला तुमच्या प्रश्नांची उत्तरे मिळतील. या वारीत अशा कितीतरी कथा, व्यथा, व्यापताप ऐकायला मिळतील. माणसाचीच काय पण देवाचीही अपेक्षा असते की, दु:खाच्या वेळी देवाकडे माणसाने धाव घ्यावी.

या कथेत आलेले बापू शिंदे सद्‌गुणी गृहस्थ आहेत. त्यांची सहिष्णुता वृत्ती या कथेत दिसून येते. बापू जीवनभाष्य करताना म्हणतात, ''जग कोणासाठी कधी थांबत नसते, ते सारखे पुढे धावत असते, जागा रिकामी झाली की ती भरून निघते.[३]''

या कथेतील नायक योगेश देवाला जाब विचारण्यासाठी वारीत सामील होतो.

'हारजीत' या कथेतील सदा शिंदे हे एक पर्चेस ऑफिसर आहेत. सर्व बाबतींत सुखी माणूस म्हणजे सदा शिंदे हे होय. पण चुलत्याच्या (धोंडू काका) सांगण्यावरून कोकणातील शेती करण्यासाठी शिंदे नोकरीचा राजीनामा देतात. हा राजीनामा शिंदेंचे सर स्वीकारत नाहीत. शिंदेंना सहा महिन्यांची रजा देतात. सदा शिंदे यांनी नोकरी सोडून शेती करणे हे घरात कोणालाच पटले नव्हते. घरातील सर्व मंडळींचा विरोध पत्करून शिंदे शेती करण्यासाठी कोकणात हजर होतात. धोंडू काकांनी शेतीसाठी लागणारी आर्थिक मदत शिंदेंकडून घेतली होती ;पण त्याची अंमलबजावणीच केली नव्हती .शेतात खड्डे

...BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

खणले नव्हते, आंब्यांची झाडे लावली नव्हती, बांध घातला नव्हता. शेतासाठी दिलेला पैसा धोंडू काकाने तसाच जिरवला होता. धोंडूकाका हे स्वार्थी व लबाड आहेत. हे कोकणात गेल्यावर लक्षात येते. म्हणून सदा शिंदे धोंडू काकांच्या माघारीच जमीन, झाडे, गुजराला विकून मुंबईला परत येतात. कथेच्या सुरुवातीला ते म्हणतात, "मान सांगावा जगात आणि अपमान सांगावा मनात. [४]"

सदा शिंदेंची घडलेली कोकणातील फजिती शिंदेंची पत्नी सरांना पत्राद्वारे कळविते. त्याच मुदतीत शिंदे ज्या कंपनीत काम करतात त्या कंपनीचे नवीन ऑफिस निघाले. त्या ऑफिसमध्ये अनुभवी व्यक्तीची गरज आहे म्हणून सदा शिंदेंचे नाव सर सुचवितात. सदा शिंदेंचा राजीनामा न स्वीकारता त्यांना सहा महिन्यांची रजा देऊन शिंदेंवर त्यांनी उपकारच केले होते. शिंदेंना मिळालेली बढती पाहून शिंदे आनंदीत होतात. त्यांचा आनंद या कथेत रेखाटला आहे.

माणसाच्या आयुष्यात हार जीत ही होतच असते. कोकणात झालेली हार आणि नोकरी ठिकाणी झालेली जीत या कथेत रेखाटली आहे.

'हारजीत' या कथेत आयुष्य जगताना येणारा अनुभव, भेटलेल्या बिलंदर अशा व्यक्ती (धोंडू काका) यांचे वर्णन या कथेत आले आहे. काकांवर आंधळा विश्वास ठेवणारे सदा शिंदे यांची घडलेली फजिती या कथेत चित्रित केली आहे.

'अखेरची भूमिका' या कथेतील नायक देवदत्त हा नाटकाचा दिग्दर्शक आहे. तसा हा दिग्दर्शक पस्तीस- चाळीस वर्षांचा ; पण त्याचे बोलणे मृदू, दुसऱ्याला भुरळ घालणारे होते. त्याच्या नाटकात काम

करणारी माधवी नाहीशी होते. त्यावेळी जनमाणसे, देवदत्तला आडून पाडून बोलत होती. 'ह्याच नराधमाने तिला फसविले आणि आत्मघात करायला भाग पाडलं'. त्यावेळी देवदत्त मृदू संगीतमय शब्दांत म्हणतो, "हे प्रभो, त्वा या वाट चुकलेल्या मानवावर प्रीत व्हावेस, त्यांच्या पापांना त्वा क्षमा करावीस.[५]" करूनसवरून देवाकडे प्रार्थना करणारा देवदत्त याचे चित्रण या कथेत केले आहे. देवदत्तला माधवीनंतर शरयू उपासनी ही तरुणी भेटते. शरयू वीस वर्षाची चवळीच्या शेंगेसारखी लवचीक शरीर असलेली. तिला दीदीराजेची भूमिका करण्यासाठी देवदत्त निवडतो. शरयूजवळ जाण्यासाठी देवदत्त आपण किती चांगली आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न करी आणि देवदत्त त्यात यशस्वी होतो. देवदत्त शरयूला चांगला वाटतो. देवदत्त त्याचा भूतकाळ सांगतो. त्यावर असणारा रोष, लोकांचे देवदत्तच्या बाबतीत असणारे मतही सांगतो. त्याने अनेक स्त्रियांना फसविले हेही सांगतो. देवदत्त शरयूला म्हणतो, "शरयू, मी असा आहे. माझा स्वीकार केलास तरच मी जगेन नाहीतर........[६]" आवेगाने उठणाऱ्या देवदत्तला छातीशी ओढून घेत शरयूने म्हटले होते. "देवदत्त, मी एकच ओळखते, आपण आता एकमेकांचे आहोत. आता फक्त मृत्यूच आपली ताटातूट करील.....[७]" त्या क्षणाला शरयूला देवदत्तसारखा चांगला माणूस कुणीच नाही असे वाटते. देवदत्त शरयूला फसवितो, शरयूने लग्नाबद्दल विचारल्यावर तिला नाही म्हणावे लागणार हे देवदत्त ओळखून होता. देवापुढे प्रार्थना करतो, "हे प्रभो, माझ्या आयुष्यातील अत्यंत कठीण क्षण आला आहे. हा क्षण जपण्याचं सामर्थ्य हे आकाशातील बापा तू या तुझ्या लेकराला दे. कारण माणूस कसोटीच्या

क्षणी मोहवश होतो, हा निर्णय घेणं कठोर असेल ; पण तो घ्यावाच लागणार आहे. अगदी कितीही दु:ख झालं तरीही."

शरयूला फसविण्यानंतर देवदत्तच्या जीवनात कीर्ती प्रधान नावाची तरुणी येते. कीर्ती प्रधान आल्यापासून देवदत्त शरयूला टाळू लागला. तापलेल्या काचेवर पाणी पडावे अशी शरयूची स्थिती झाली. देवदत्तला ती लग्नाबद्दल विचारते तेव्हा तो नकार देतो. म्हणून ती खचून जात नाही तर उद्या जगाला मी काय उत्तर देऊ ? असा प्रश्न देवदत्तला करते. देवदत्त तिला म्हणतो, "माझा काय संबंध ? पितृत्व हे नेहमी संशयास्पद असतं. " असा संकुचितवृत्तीचा, स्वार्थी देवदत्त या कथेत भेटतो.

शरयू देवदत्तने नाकारल्यामुळे उदास होते; पण स्वत:ला ती त्या धक्क्यातून सावरते. देवदत्तकडून नवीन नाटकाची भूमिकाही शरयू स्वीकारते. देवदत्तबरोबर महाबळेश्वरला जाते. त्या रम्य वातावरणात तिच्या चित्तवृत्ती पालवल्या हे चतुर देवदत्तने ओळखले. शरयू देवदत्तच्या लोभसवाण्या चेहऱ्याकडे पाहत असताना तिच्या मनात विचार येतो, 'देवदत्तच्या चेहऱ्याइतकच त्याचं मन सुंदर असतं तर शरयूसारखी भाग्यवान स्त्री आणखी कुणीच नाही. देवदत्तची प्रत्येक भूमिका गाजली असती आणि देवदत्तासाठी सारं जग वेडं झालं असतं'.

शरयू व देवदत्त संध्याकाळी लुडविग पॉईंट बघायला गेल्यावर हे विचार तिच्या मनात येतात. त्याचवेळी उंच कड्यावर गेल्यावर शरयू देवदत्तला घट्ट मिठी मारते. क्षणार्धातच त्या दरीत कड्यावरून खाली स्वत:बरोबर देवदत्तला लोटून देते.

शरयू आपली अखेरची भूमिका पूर्ण करते. देवदत्तसारख्या स्वार्थी माणसाला धडा शिकविण्याचा प्रयत्न करते. देवदत्त मुलींना फसवून आपण त्यातले नाही असा भास निर्माण करतो. अशा देवदत्तला ती योग्य शिक्षा देते आणि त्यासाठी स्वत:ही शिक्षा भोगते. अशी एक वेगळी व्यक्तिरेखा येथे साकार केली आहे. देवदत्त हा अत्यंत ढोंगी व स्वार्थी वाटतो.

'पडदा' या कथेतील नायक राजेश हा बॉम्बे पोर्ट ट्रस्टमध्ये हिशेब खात्यातील एक कारकून आहे. राजेंद्र कणेकर याची निवड नाटकात बल्लाळच्या भूमिकेसाठी केली जाते. राजा नोकरी करून नाटकाची तालीम करून घरी येतो. तेव्हा पत्नीला झालेल्या नाटकाची गंमत सांगतो. राजेश हा गरिबीतून शिकलेला, मिळेल ते काम करणारा असा त्याचा स्वभाव आहे. राजेशाची व अमला धारपची (पत्नी) ओळख पापड पोहचवायला गेल्यानंतर झाली. अमला ही मध्यमवर्गीय मुलगी, ती मराठी शाळेत शिक्षिका आहे. तिला राजेंद्रचा स्वभाव आवडतो. त्याच्याशी अमला लग्न करते. राजेंद्रच्या नाटकात प्रियवदेची भूमिका मिसेस चित्रे करतात. त्या डॉक्टरांच्या मिसेस आहेत. त्यांनीच या नाटकाच्या क्लबला अर्थसहाय्य केले. डॉ. चित्रे क्लबचे अध्यक्ष होते. त्यामुळे सरोज चित्रे यांना विशेष महत्त्व होते.

राजेंद्र चाळीत राहतो. त्याची मुले मराठी शाळेत शिकतात. चाळीतील दोन खोल्यांमध्ये त्याचे बिऱ्हाड, शे- दोनशे रुपये शिल्लक पडले तर हात स्वर्गाला पोहचल्याचा राजेद्रला होणारा आनंद या कथेत चित्रित केला आहे.

राजेंद्रने तयारी केलेल्या नाटकाचा दिवस येतो. प्रियवंदा-

बल्लाळ यांच्यातील संवाद चांगला होतो. मिसेस चित्रेंचे काम चांगले होते. तेव्हा डॉ. चित्रे मिसेस चित्र्यांना बाहेर फिरायला घेऊन जातात. पण त्याचवेळी राजेशच्या मनात विचार येतो की, या नाटकामुळे आपली खूप कामे रखडली आहेत. त्याकडे लक्ष द्यायला हवे. मुलांचा अभ्यास घेतला पाहिजे. ऑफिसची कामे केली पाहिजेत. या कथेतील राजेंद्रला नाटकाचा पडदा पडताच वास्तव जीवनाची जाणीव होते. त्याची पडद्यावरची भूमिका तो पार पाडतो; पण त्याला त्याच्या जीवनाची भूमिका पार पाडायची असते. याचे भान असणारा राजेंद्र या कथेत भेटतो.

'पडदा' या कथेत आलेला राजेंद्र काणेकर हा मध्यमवर्गीय माणूस आहे. त्याच्या असणाऱ्या इच्छा परिस्थितीमुळे त्याला माराव्या लागतात. याचे चित्रण या कथेत आलेले आहे. सरोज चित्रे याच्या घरातील वातावरण आणि राजेंद्र राहतो ते चाळ जीवन याचे चित्रण लेखकाने राजेंद्रद्वारा केले आहे. उच्च जीवन आणि चाळीतील जीवन यांचे वर्णन करून मानवी जीवनाचे वैविध्यपूर्ण दर्शन येथे घडवले आहे.

'दास' या कथेतील नायक प्रधान हा एका कंपनीत नोकरी करणारा आहे. प्रधानला कंपनीच्या नाटकात जोरावर सिंगाची भूमिका मिळते. प्रधानचा हा शो बघण्यासाठी राजेंद्र प्रधानच्या कंपनीचे शेटजी व इतर मोठी मंडळी येणार असतात. या मंडळींना आपले काम आवडले पाहिजे यासाठी राजेंद्र प्रधान प्रयत्न करतो. नाटकात राजेंद्रची भूमिका संस्थानिकाची आहे. पण आपले काम त्याच्या वरिष्ठांना आवडावे म्हणून तो प्रयत्न करतो. नाटकात तो संस्थानिक असला तरी तो कंपनीचा एक दास आहे याची राजेंद्रला जाणीव आहे.

राजेंद्र प्रधान हा गरीब घरातील आहे. चाळीतील येणाऱ्या अडचणी त्याला माहीत आहेत. त्याची पत्नी विजू ही नाटकाला येणार नाही हे राजेंद्रला माहीत आहे. तरीही राजेंद्र विजूची वाट बघतो. विजूचा चाळीत राहताना होणारा कोंडमारा, प्रत्येक गोष्टीत होणारी फरपट राजेंद्रच्या लक्षात येत होती. कधीतरी राजेंद्रच्या भावाला स्वतंत्र जागा मिळेल आणि कधीतरी दिराना हे घर सोडून जावेच लागणार आहे. या विश्वासावर ती मनाचा कोंडमारा सहन करीत होती. एकत्र कुटुंबपद्धती ही चाळीच्या छोट्या खोल्यांत राहताना कशी त्रासदायक ठरते याचे चित्रण या कथेत केले आहे. पण विजूला असणारा विश्वास , त्या विश्वासावर तिचा होणारा कोंडमारा लेखकाने चित्रित केला आहे.

'दास' या कथेतील राजेंद्रची एकच इच्छा आहे. त्याचे नाटकातील काम चांगले झाले तर शेटजी चांगली नोकरी देतील. राजेंद्रला असलेली आशा या कथेत येते. मध्यमवर्गीय माणसाची होणारी कुचंबणा या कथेत येते.

'ढाई अक्षर' ही कथा तशी विनोदी आहे. कुमार आणि नवीन हे दोघे मित्र आहेत. नवीन कुमारला भेटायला ऑफिसमध्ये जातो. कुमारची स्टेनो शमा हिच्याशी नवीनची ओळख होते. नवीन नोकरीसाठी आला आहे असे शमाला वाटते म्हणून त्याचे नाव विचारते, शिक्षण विचारते. त्यावेळी नवीन तिला त्याचे खरे नाव सांगत नाही तर प्रमोद पंडित हे खोट नाव सांगतो. नवीनही तिची फिरकी घेतो. नंतर शमाला प्रमोद पंडित (नवीन) कोणत्याना कोणत्या कारणाने भेटतो. प्रमोद पंडित (नवीन) हा गरीब, नोकरी नसलेला तरुण असे शमाला वाटते म्हणून ती नवीनला पैसे

खर्च करू देत नाही. ती म्हणते, ''पंडित , आज ना उद्या तुम्हांला नोकरी लागेल ;पण एक गोष्ट लक्षात ठेवा, माझी मम्मी मला सांगते, शामा, पैसे मिळवण्याप्रमाणे पैसे जपून खर्च करणे महत्त्वाचे असते.८''

मध्यमवर्गीय असणारी शमा व तिच्या कल्पना वृत्ती या कथेतून दिसून येतात. शमा प्रमोद पंडित (नवीन) ला पैसे खर्च करू देत तर नाहीच आणि त्याच्या नोकरीसाठी जाहिरात शोधून त्याची कात्रणे प्रमोद (नवीन) ला देते.

शमा रसिक, कलाप्रिय आहे. जशी नवीनची व शमाची मैत्री अधिक घट्ट होते तशी ती अधिक मोकळेपणाने बोलू लागते. नवीन भेटल्यावर नोकरीविषयी विचारते. शमाने एका रविवारी प्रमोद पंडित (नवीन) ला चहाला बोलविले होते. शमाला आपण आवडतो हे नवीनला माहीत होते. नवीनचे नाव प्रमोद पंडित नसून नवीन आहे. तो आर्किटेक्टर आहे हे तिला ऑफिसमध्ये समजते. नवीनने शमाला न कळत का होईना फसविले. त्यामुळे तिच्या मनात चीड निर्माण होते. तिच्या स्थिर दृष्टीतून नवीनला समजते. 'तू नंतर भेट मला म्हणजे बघते तुझ्याकडे' असा भाव शमाच्या डोळ्यांतून व्यक्त होतो.

शमाची सहानुभूती, दुसऱ्याला मदत करण्याची वृत्ती या कथेत चित्रित केली आहे. शिवाय नकळत शमाही नवीनवर प्रेम करू लागते.

'मोठ्या बाई' या कथेत कर्तृत्ववान स्त्रीचे चित्रण आले आहे. सुलोचना बाईंनी काढलेले हाल या कथेत चित्रित केले आहेत. सुलोचना बाई ह्या मुख्याध्यापिका आहेत. सुलोचना बाईंनी घरची परिस्थिती नसताना खडतर परिश्रम करून शिक्षण घेतले. वडील स्वार्थी होते. सुलोचनाबाई हुशार होत्या, तरी त्यांचे वडील शिकवायला तयार नव्हते.

सुलोचना बाईंनी उपाशी राहून दिवस काढले. शेवटी वडील रागाने 'मर शीक पण मी एक पैसा खर्च करणार नाही' असे म्हणतात. दैवानं सुलोचना बाईंचा पहिला नंबर येत गेला. बक्षिसे, शिष्यवृत्त्या मिळत गेल्या. नोकरी करून पुढचे शिक्षण त्या घेऊ लागल्या. तेव्हा वडील 'आल्या पंडिता रमाबाई' म्हणून राग करत. सुलोचनाबाई शिकल्या. त्यांना मनसारखी नोकरी मिळाली. धाकटी भावंडे शिकली. त्यांची लग्ने झाली. सुलोचना बाईंच्या जीवनात रवींद्र नावाचा तरुण आला. पण त्यावेळी त्यांनी त्याच्याकडे पाठ केली. 'आपलं काही चुकलं का ?' असा विचार त्या करतात. सुलोचना बाईंच्या जवळ सगळे असून त्या एकट्याच पडतात. त्यांच्या नशिबी एकाकीपणा येतो.

सुलोचनाबाईंच्या शिक्षक स्टाफमध्ये मीना परांजपे म्हणून शिक्षिका आहे. तिचे प्रेम सुधीर नावाच्या युवकाशी आहे. हे बाईंना माहीत होते. मीनाला सुलोचनाबाई बोलवून घेतात. तिला समजविण्याचा प्रयत्न करतात. लग्नाला एक - दोन महिने राहिले आहेत तर दुसऱ्याच्या नजरेस येईल असे वागू नकोस हे सांगतात. मीनाची चूक तिच्या लक्षात आणून देतात. तिला समजविताना सुलोचनाबाई म्हणतात, ''आणि दुसरं आता तू संसार मांडणार आहेस. त्यातील एक गोष्ट आयुष्यभर लक्षात ठेव आपल्या पानात काय पडणार आहे हे अगोदर कळलं म्हणजे जेवणातली उत्सुकता कमी होते. पातेलीवर झाकण ठेवावं. दुसऱ्या शब्दांत सांगायचं तर महिना दोन महिन्यात तू जितकी दूर राहशील... ......... ......[१]'' यातून सुलोचनाबाईंना संसाराचा विचार अगोदरच केलेला बरा हे सुचवायचे आहे.

'मोठ्या बाई' या कथेतील सुलोचना बाईंना वाटणाऱ्या एकाकीपणाचे चित्रण लेखकाने योग्य प्रकारे केले आहे. तसेच मीनाला लोकांच्या रोषापासून वाचविण्यासाठी समजावीत असताना सुलोचनाबाई अगदी थंडपणे मीना बाईंना पटेल अशा शब्दात पटवून देतात. सुलोचना बाईंचा अनुभव व जीवनावर भाष्य करण्याची वृत्ती येथे दिसून येते. सुलोचना बाईंचे असणारे चौफेर निरीक्षण या कथेत दिसते. सुलोचना बाईंना सगळे असून नसल्यासारखे वाटते. एकाकीपणाचे दु:ख त्यांच्या बोलण्यातून दिसून येते.

'धुके' या कथेतील सुसान ही चांगल्या घरातील आहे. तिला चित्रकलेची आवड आहे आणि त्यात ती सुंदर आहे. सुसानला मायकेल नावाचा मित्र होता. हा मायकेल तिला सायन्स घे म्हणून सांगतो. त्यावेळी सुसान त्याचे एकत नाही आणि जे जे आर्ट्स ला जाते. तेथून ती सौंदर्य स्पर्धेत भाग घेते. तिला यश मिळते. त्या यशाने ती भारावते. पण ते यश क्षणिक आहे, हे तिच्या लक्षात येत नाही. ह्याची जाणीव तिला वयाच्या एकोणतीस वर्षांनी होते. सौंदर्य आहे तोपर्यंत सौंदर्य सम्राज्ञी म्हणून मान मिळतो, पण नंतर लोक विसरतात. सुसानला मिळालेले मेडल्स, कप्स, ट्रॉफीज याचे गिलिट उडाल्यामुळे ते विरूप दिसतात तसेच तिचे सौंदर्य कमी होऊ लागल्याची सुसानला जाणीव होते.

सुसान मनोविश्लेषण करते. आपण त्यावेळी मायकेलचे ऐकले असते तर बरे झाले असते असे तिला सतत वाटते. ती ह्या विचाराने उदास होते. मायकेलच्या पत्रांना ती उत्तर देत नाही. सुसानच्या जीवनाची वाट धुक्यात हरविल्यासारखी वाटते. हे ह्या कथेतून लेखकाने सांगितले आहे.

सुसान अमेरिकेत स्पर्धेसाठी जाते. तेथेच राहते. मम्मी, पप्पा यांनी भारतात बोलवूनही येत नाही. त्याची खंत सुसानच्या मनात निर्माण होते. पुढे मायकेल सर्जन झाला, त्याचे लग्न बड्या घरच्या मुलीशी झाले. त्याचा व्यवसाय चांगला चालू आहे. मायकेल अमेरिकेत येणार हे समजताच आपण मायकेलला ओळखत नाही असा कोरा चेहरा सुसान ठेवते.

'तर ही डोरिथी' या कथेतील नायक वेद. त्याचे डिपार्टमेंटल स्टोअर आहे. मुख्य व्यवसाय जडजवाहीर आणि पुराण वस्तुसंग्रहाचा आहे. वेदला स्त्रियांच्याबद्दल राग आहे. स्त्रियांचे नाटकी लाजणे, हसणे त्याला आवडत नाही. माणसाच्या स्वार्थी स्वभावाबद्दल म्हणतो ,"साप सोडावा माणूस मारावा." या विधानावरून त्याचा स्वार्थी माणसाबद्दलचा राग व्यक्त होतो. वेदचे आई-वडील वेदने लग्न करावे म्हणून पाठीमागे लागतात. पण वेद लक्ष देत नाही. त्याला कसल्याच प्रकारचे बंधन नको होते. वेदला व्यवसाय करायचा होता. वेदचे लग्न झालेले मित्र भेटले की, त्यांच्या असलेल्या सवयी, आवडी-निवडी यात झालेले बदल आपल्याबाबतीत होऊ नयेत म्हणून तो लग्नाचा विचार करत नाही. वेदचा पेंडशे नावाचा मित्र भेटतो. वेद त्याला सिगार पीत नाही का ? असे विचारतो तर बायकोला आवडत नाही असे उत्तर देतो. इतर मित्रांची ही अवस्था पाहून हे बंधनच आपल्यावर नको असे वेदला वाटते. सर्व मित्र आपआपल्या संसारात गुंतल्यावर वेदला एकाकीपणाची जाणीव होते. त्यावेळी वेद पी. ए. डोरिथीला घेऊन महाबळेश्वरला जातो. तेव्हा वेदच्या लक्षात येते. डोरिथी व वेदच्या आवडीनिवडी एक आहेत. वेद डोरिथीला बिना विचारता महाबळेश्वरला घर, थोडी जमीन घेतो. त्यावेळी

डोरिथीने रंगविलेले स्वप्न पाहून वेद स्तब्ध होतो. ती वेदला सांगते, "आणि वेद, आज काम जरा लवकर आटोप. न्याहारी झाली की, आपण आपल्या जागेतून फिरून येऊ. जागा नुसती पैसे मोजून आपली होत नाही. जागेवर माणसाचं प्रेम असावं लागतं. तुला सांगू वेद, मातीचे कणही माणसाच्या स्पर्शासाठी आसूसलेले असतात[१०]." त्यावेळी वेद डोरिथीपुढे लग्नाची मागणी घालतो.

या कथेत आलेला वेद याच्याकडे पैसा भरपूर आहे. फक्त पैसा असून जीवन जगता येत नाही. जीवन जगण्यासाठी जीवनसाथीची गरज आहे. मित्रांनी लग्न करून बंधने लादून घेतली असा म्हणणारा वेद शेवटी लग्नासाठी तयार होतो.

'वाळवण' या कथेतील रमाबाई नवऱ्यासाठी वाटेल ते कष्ट करायला तयार आहेत. भारतीय संस्कृतीचे चित्रण या कथेत केले आहे. मूल बाळ नसताना नवऱ्याची काळजी घेणाऱ्या रमाकाकूंचे चित्रण केले आहे. या विरुद्ध असणारे नानांचे चित्रण समर्थपणे चित्रण केले आहे. त्यांचा स्वभाव स्वार्थी आहे. ते कोणाचीही काळजी करत नसत. रमा आजारी असली तरी नाना तिची चौकशी न करता चहापानी मिळेल का नाही याची काळजी करतात. नाना नोकरी करत होते. त्यांचा मनापासून नोकरीला विरोध होता. तरीही रमाच्या सांगण्यावरून चिडचिड करून ते नोकरीवर हजर राहत. त्यांना काम नकोच वाटतं. नानांना आवडणाऱ्या सर्व गोष्ट रमा आठवणीने करीत असते. पण एक दिवस नानांची नोकरी जाते. बँकेत अफरातफर केल्या कारणावरून नानांना जेलमध्ये जावे लागते. त्यावेळी रमा त्यांना वाचविण्याचा बराच प्रयत्न करते. रमा

स्वत:चा विचार न करता कामाला जाऊ लागली. रमाने चांगले खाणे-पिणे वर्ज्य केले. कारण नानाला तुरुंगात काही मिळत नाही. नानाला भेटण्यास तुरुंगात जाते. त्यावेळी नाना थकल्यासारखे तिला वाटतात. त्यांना झोपताना गादी नाही म्हणून रमा स्वत: गादीवर झोपण्याचे टाळते; नानांना न मिळणाऱ्या सुखसोयी रमा टाळते पण याचे काहीही भान नसलेले नाना या कथेत भेटतात. नाना घरी आल्यावर नोकरी गेली म्हणून काळजी करू नका असे सांगणारी रमा स्वत:च्या जीवनाचे नानांसाठी वाळवण करून घेते.

``नानांना माहीत होते की, जोपर्यंत रमा नावाचं त्यांच्यासाठी माळावर उभे राहून वादळवारा सोसणारे, ऊन - पाऊस झेलणारे झाड आहे तोपर्यंत आपल्याला काहीच कमी पडणार नाही''.यातून रमाबाईंच्या व्यक्तिरेखेचा चांगला परिचय होतो.

या 'वाळवण' या कथेत भारतीय संस्कृतीचा वारसा जपणारी रमाबाई दिसून येते. पतीला परमेश्वर मानणारी आपली संस्कृती व या संस्कृतीची जपणूक करणाऱ्या भारतीय स्त्रीचे चित्रण या कथेत केले आहे.

'ही वाट एकटीची' ही करुण कथा आहे. या कथेतील सोना गरीब घरातील आहे. सोनाची आई सोना लहान असतानाच मरण पावली. म्हणून तिच्या बापाने म्हणजे मल्या गोंधळीने दुसरे लग्न केले. सोनाच्या दुसऱ्या आईचे नाव शेवंता होते. ही शेवंता सोनाला त्रास देत होती. म्हणून मल्याने शेवंताला मारले. शेवंता दोनदा माहेरी पळून गेली. तिला समजावून परत आणली.

सोना ही हुशार होती. ती ज्या वस्तीत राहत होती त्या वस्तीत नवीन शाळा निघाली. त्यामुळे सोना शाळेत जाऊ लागली. सोना हुशार होती म्हणून गुरूजी सोनाच्या वडलांना बोलवून घेऊन सांगतात की, सोनाला पुढे शिकवावे. पुढे सोना शिकली.शिक्षिका झाली. स्वत:च्या पायावर उभी राहिली. पण या आयुष्यात तिच्या नशिबी चांगले - वाईट अनुभव आले. खालच्या समाजातील मुलगी कितीही शिकली तरी तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन तोच राहतो याची जाणीव सोनाला होत होती.यातून शूद्र समाजाकडे पाहण्याची लोकांची प्रवृत्ती दिसून येते.

सोन ज्यावेळी बी. ए. ला होती त्यावेळी तिच्या वर्गात प्रतापराव हिंमतराव रावराजेशी हा मुलगा होता,तिचा त्याच्याशी परिचय होतो. सोना त्याला नोट्स् देत असे. प्रतापवर ती प्रेम करू लागली. पण तिचे हे स्वप्न आरशासारखे फुटले. प्रतापला कोणीतरी तिच्यावरून छेडले तेव्हा प्रताप म्हणतो, ''यार, पुन्हा असलं काही बोलू नकोस. खानदानी मराठा आहे मी. दासी आणि बटकीला कोणी महाराणी बनवीत नसतं.....[११]'' प्रतापचे हे बोलणे सोनाला कडू लागते. तिचा दुसरा अनुभव म्हणजे नामुधुळा चौधरी हा शिक्षक सोनाशी अगत्याने बोलत होता. त्याच दरम्यान सोनाचे चुलते सोनाला भेटावयास शाळेत जातात. तेव्हा सोना मुद्दाम चुलत्यांशी बोलणे वाढविते. त्यावेळी सर्व शिक्षक पुस्तके घेण्यासाठी शिक्षक खोलीत येत. चुलत्यांच्या अंगावरचे गोंधळ्याचे कपडे बघून निघून जात. चौधरी सरही पुस्तके घेऊन जाताना सोना त्यांना बोलवतात. चुलत्यांशी चौधरी सरांची ओळख करून देते. तेव्हापासून चौधरी तिला खड्यासारखे बाजूला ठेवतो.समाजात जातीयता

किती खोलवर रुजली आहे हेही या कथेतून दाखवून दिले आहे.

सोना नोकरी करू लागली. त्यामुळे तिची भावंडे शिकली. चांगली परिस्थिती आली तरीही मल्या गोंधळीला समाज सळो की पळो करून सोडतो. त्याला लोक अडून अडून बोलतात. मुलीच्या जीवावर खातो. निदान तिला खंडोबाला मुरळी म्हणून तर सोड असे बोलतात. सोनाला तिच्या जातीतील शिकलेला मुलगा मिळत नाही. त्याचवेळी जातीतील फौजदार मुलगा सांगून येतो. मल्या त्या फौजदाराची चौकशी करतो. फौजदार सोनाला भेटायला येतो. अचानक सोनाला निनावी पत्र येते. फौजदाराने पहिल्या पत्नीचा खून केला असावा असा लोकांचा तर्क होता. अशा फौजदाराशी लग्न करण्यापेक्षा विहिरीत जीव दिलेला बरा असा विचार सोना करते.

सोनाने तिच्या सुखी जीवनाचे सुंदर चित्र मनात रेखाटले होते. पण भयाने तिच्या देहावर काटा उठला. तिच्या मागे पुढे दोन्ही बाजूला मरण प्राय जीवन होते. जातीबाहेर विवाह करता येत नाही आणि आपल्या जातीत शिकलेला मुलगा नाही. त्यामुळे सोनाची झालेली कोंडी या कथेत पाहयला मिळते. शेवटी सोना आत्महत्या करते. आपल्या समाज व्यवस्थेचे चित्रण या कथेत आलेले आहे. खालच्या समाजातील मुली कितीही शिकल्या तरी त्यांच्याकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन बदलत नाही. त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते हे येथे सोनाच्या व्यक्तिरेखेतून दिसून यते.

**'वंशज'**

या कथेतील प्रतापराव 'जनसेवक' च्या उपसंपादकपदी असताना त्याला अनेक वृत्ती- प्रवृत्तीची माणसे भेटतात. त्यांचे चित्रण या कथेत

केले आहे. 'जनसेवक'चा मुख्य मालक सर्जेराव पाटील. जनसेवकमध्ये प्रतापरावांनी काम करावे अशी सर्जेरावांची इच्छा होती. प्रतापचे बोलणे सर्जेरावांना पटते. त्यावेळी सर्जेराव म्हणतात, ``आमच्यावर टीका केलीस तरी आमचं काही म्हणणं नाही.'' प्रतापराव हे सडेतोडपणे टीका करत. जनसेवकमध्ये प्रतापरावांना उपसंपादकाची नोकरी दिली जाते. प्रतापरावांचा दृष्टिकोन टिळकांच्या विचारांसारखाच होता. प्रतापराव लेख लिहीत असताना विविध विषयांवर व वास्तव परिस्थितीवर लिहीत होते. त्यामुळे त्यांना बरीच प्रसिद्धी मिळाली होती. प्रतापरावांना व्याख्यानासाठी लोक आमंत्रण देत होते. पंचक्रोशीतील कोणतीही समस्या घेऊन लोक प्रतापरावांकडे जात. नागोजीराव कावळे पाटील हे शिक्षण मंडळाचे सर्वेसर्वा होते. त्यांच्या संस्थेत शिक्षकांना कोणत्याही संघटनेत सामील होता येत नाही. शिक्षकांना कट पेमेंट स्वीकारावे लागे. या गोष्टीला दोन शिक्षकांचा विरोध होता. त्या दोन शिक्षकांच्या सांगण्यावरून प्रतापराव नागोजींच्या विरोधात लेख लिहितात. लोकमान्य टिळकांनी लेखणी का झिजवली तर दीन दुबळ्यांची सेवा करण्यासाठी. तसेच तत्त्व प्रतापरावांचेही होते.

सर्जेराव परदेशात गेल्यानंतर सर्जेराव परत येईपर्यंत प्रतापराव वाट बघतात. ज्यावेळी सर्जेराव येतात तेव्हा तो लेख नागोजीच्या विरुद्ध आहे हे समजताच त्या दोन शिक्षकांची लेखी जबानी मागतात. काही लेखी असले तर ह्यानंतर बघू असे सर्जेराव सांगतात. सर्जेराव व नागोजीराव हे दोघे मित्र होते. नागोजीराव सर्जेरावांना निवडणुकीसाठी तिकिट देणार होते. त्यामुळे सर्जेराव नागोजीच्या मागे पुढे करत होते.

त्या दोन शिक्षकांना मारहाण करून त्यांना दाब दाखवून त्यांच्या सह्या घेण्यात आल्या.

नागोजीराव प्रतापरावांना सरळ म्हणतात, "आम्हांला सगळ्यांना बरोबर घेऊन काम करायचं आहे. बेरजेचं राजकारण करायचं नाही, वजाबाकीचं नाही." एक दिवस प्रतापरावांना निनावी पत्र आले. नागोजीरावांनी प्रतापरावांना कशी शेंडी लावली. सर्जेराव हा चालू माणूस आहे. नागोजीचे राजकारण बेरजेचे नसून ते भागाकारीचे आणि ठोकाठोकीचे होते. हे प्रतापरावांच्या लक्षात आले. त्या दोन शिक्षकांना पाय हात मोडून टाकण्याची धमकी दिली होती. ही माहिती पत्रातून कळते.

शिक्षण क्षेत्रातही राजकारण आणि भ्रष्टाचार यांचा शिरकाव झाल्याचे दिसून येते. या कथेतून प्रतापरावांना जाणवते की, आपण लोकमान्यांच्या तत्त्वाप्रमाणे वागायचे ठरवतो ; पण ती आपल्याला पचतील की नाही याची शाश्वती देता येत नाही.

या कथेवरून वास्तवता चित्रित केली आहे. राजकारणी सत्तेसाठी, पैशासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे सर्जेराव पाटील हे होय याचे चित्रण या कथेत केले आहे. जनसेवक वृत्तपत्राचे संपादक होण्याचा मान प्रतापरावांना मिळतो; पण लोकमान्यांच्या तत्त्वांचे आपण पालन करू शकलो नाही याची प्रतापरावांना खंत वाटते. लोकमान्यांचे आपण वंशज बनू शकलो नाही असे सतत वाटते. राजकारणी खेळ्या, एकमेकांना शह देण्यासाठी केलेले प्रयत्न हे प्रतापरावांना माहीत असूनही प्रतापरावांनाच फसविण्याचा प्रयत्न नागोजी व सर्जेराव पाटील करतात. या कथेत

ज्ञानासारख्या पवित्र ठिकाणी भ्रष्टाचार करणारे कावळे त्यांना भेटतात.

'शर्त' या कथेतील रमेश आगरवाल व डॉक्टर पंडीत यांच्या मित्रत्वाचे चित्रण या कथेत येते. अगदी वेगवेगळ्या फिल्डमध्ये असणारे पण एकमेकांचे जिगरी दोस्त असणारी ही जोडी आहे. रमेश आणि डॉ. पंडीत या दोघांची ओळख वक्तृत्व स्पर्धेच्या वेळी झाली होती. दोघेही समवयस्कर होते. त्यामुळे दोघांची वैचारिकदृष्ट्या चर्चा होत असे. रमेश हा श्रीमंत घरातील तर डॉ. पंडीत हे मध्यमवर्गातील आहेत. रमेश पंडितांच्या घरी येत. पण रमेशच्या जीवनात वेगळीच घटना घडली. रमेशला विदेशा प्रधान नावाची मुलगी आवडत होती; पण ती त्याला विचारत नव्हती. त्यामुळे रमेश नाराज होता. डॉक्टर पंडीतांच्या एन. एस. ए. च्या कार्यक्रमात रक्तदान शिबिरात विदेशा प्रधान भेटली. त्यावेळी पंडीतची व तिची ओळख होते. नंतर एका मित्राच्या लग्नाला गेल्यावर तेथे विदेशा दिसते. त्यावेळी विदेशा चिडली होती. हुंडा देऊन लग्न करणे आणि शोभेची बाहुली बनून राहणे हे तिला आवडले नव्हते. विदेशाला श्रीमंताचा फार राग येई. तिला पंडीत सरळ विचारतो. तुम्हांला नक्की कोणाचा राग येतो. 'श्रीमंतींचा की , श्रीमंताचा' त्यावेळी विदेशा आर्थिक व्यवस्थेवर भाष्य करते.

विदेशा ही लहरी स्वभावाची होती. हे डॉ. पंडीतांच्या लक्षात येते. डॉ. पंडीत रमेशला युक्ती सांगतात. विदेशा आली तर नजर चुकवायची, तिच्या बरोबर जास्त बोलायचं नाही. त्याप्रमाणे रमेश वागतो. पुढे विदेशा भेटल्यावर डॉ. पंडीत सरळ विचारतो, "काय कशी झाली सहल ?" तिला काही कळत नाही. ती म्हणते, " कसली सहल ?" पंडीत खोटे

सांगतो. दहा लोक तुम्ही रायगडला गेलात. दोन दिवस मुक्काम केलात. शेकडो फोटो घेतलेत आणि कसली सहल म्हणून काय विचारताय. त्यावर ती बुचकळ्यात पडते. पुढे पंडीत गडबडीने रमेशच्या तब्येतीची काळजी व चौकशी करतो. त्याचे आई-वडील गावी गेलेत आणि रमेश आजारी पडला हे खोटे सांगतो. त्यावेळी ती रमेशकडे जाते.

'शर्त' या कथेत माणसाच्या लहरी स्वभावाचे चित्रण केले आहे. या कथेत आधुनिक विचारसरणी असलेले डॉ. पंडीत, रमेश, विदेशा भेटतात. त्यांच्या तोंडची भाषा आधुनिक आहे. या कथेतील विदेशा तडफदार आहे. तिला श्रीमंतीचा व श्रीमंताचाही राग येतो. त्यामुळे ती रमेशलाही विचारत नाही.

'भूक' या कथेतील नायक विनय जोशी याला वडील नाहीत. आईने लहानाचे मोठे केले. चुलता होता पण तो सतत विनयचा पाण उतारा करी. त्याला हिणवण्यात त्याला आनंद होई. विनयची चुलत भावंडे विनयला पोरका म्हणून चिडवत होती. विनय गावात सातवीपर्यंत शिकतो. पुढे शिक्षण घेण्यासाठी तो मुंबईला जाण्याचे ठरवतो. त्यावेळी चुलत्यांचे म्हणणे असते, 'विनयने पुढे शिक्षण घेण्यापेक्षा नोकरी करावी.' तीही गावातच करावी. विनय मुंबईला जाण्याचे ठरवतो. त्यावेळी चुलता म्हणतो, "भिकेची हांडी कधी शिंक्याला जात नाही[१२]" विनय पुढे सी. ए. होतो. गुलशनशी परिचय होतो. तिच्याबरोबर विवाह करतो. विनयची आई कोकणात राहते. विनय तिला त्याच्याजवळ राहण्याचा आग्रह करूनदेखील ती त्याच्याजवळ राहत नाही. कारण तिचा विनयच्या चुलत्यांवर भरोसा नसतो. विनयचा चुलता स्वत:ची झाडे

सोडून विनयची झाडे विकेल. तसेच विनयचा चुलता घरावरची कौलेसुद्धा विकायला कमी करणार नाही असे त्याची आई नेहमी म्हणत असे. विनयची आई मरण पावते. तरीही विनय कोकणात सुटीला जातो. गुलशनला नेहमी प्रश्न पडतो की, विनय कोकणात का जातो ? चुलत्याला भेटण्यासाठी म्हणावे तर असा चुलता चांगलाही नाही. पण तो कोकणात जातोच. एक दिवस विनय गुलशनला सांगतो. ज्यांनी विनयचा पाणउतारा केला त्यांना विनयबद्दल कमालीचा मत्सर तरी वाटू दे अशी आपली अपेक्षा आहे. विनयला त्याच्या व आईच्या अपमानाचा सूड घ्यायचा होता म्हणून तो कोकणात जातो. चुलत्यांना व त्याच्या मुलांना कपडे, त्यांच्या मुलांना भेटवस्तू घेऊन विनय त्यांना भेटायला जातो. तो गुलशनला म्हणतो, "प्रतिस्पर्ध्यावर मात करण्यातलं सुख अजून हवंहवंसं वाटतं.[१३]"

'भूक' या कथेतील नायक विनय स्वाभिमानी आहे. परिस्थिती नसताना जिद्दीने शिकणारा विनय, आणि विनयने शिकू नये म्हणून प्रयत्न करणारा चुलता या कथेत भेटतो. तरीही स्वकर्तृत्वावर यश संपादित करणारा विनय आणि त्याच्या यशाचा हेवा करणाऱ्या चुलत्यांच्या व्यक्तिरेखा या कथेत उठावदारपणे येतात; आणि त्यातून उत्तम प्रकारे मानवी स्वभावाचे दर्शन घडते. प्रस्तुत लेखकाच्या कथा घटनाप्रधान नसून प्रवृत्ती प्रधान वाटतात. त्यात मानवी स्वभावाच्या वैविध्यपूर्ण आविष्काराला प्राधान्य दिले आहे.

'विरले स्वप्न मराठी एक' एका मराठी तरुणाचे स्वप्न आहे की, आपण कारखाना काढायचा. त्यात सामान्य लोकांचाही समावेश करता

येईल. असा त्याचा निश्चय असतो. पण त्याला येणाऱ्या अनेक अडचणी या कथेत चित्रित केल्या आहेत. घाटपांडे याने आपण स्वत: कारखाना काढण्याचे ठरविले होते. त्यासाठी त्याला कर्ज हवे होते. ते कर्ज मंजूर होण्यासाठी त्याला अनेक हेलपाटे घालावे लागतात ; पण कर्ज मंजूर होत नाही. अमराठी लोकांना कारखानदारी जमते मग आपल्याला का जमू नये ? असे घाटपांडेला वाटते. कर्जासाठी घाटपांडे बँक मॅनेजरला भेटायला जातो. त्यावेळी तुम्ही बँकेला काय तारण ठेवणार असा प्रश्न मॅनेजर करतो. अमराठी लोक एकमेकांना पुढे जाणाऱ्यास मदत करतात; पण आपले मराठी लोक आपल्यातला मनुष्य पुढे निघाला म्हणून पाय ओढण्याचे काम करतात. यावरून मराठी माणसांच्या संकुचित वृत्तीचे चित्रण लेखकाने केले आहे. घाटपांडेला कर्ज कोठे मिळत नाही. तोपर्यंतच बळीराम दादा त्यांना आपणास बॉडीगार्ड म्हणून कामावर घेण्यासाठी भेटतो.

नंतर आयटकचा प्रतिनिधी भेटायला येतो. आयटक ही मोठी संघटना आहे. ही संघटना कामगारांचे प्रश्न सोडविते आणि कामगार-मालक यांच्यातील तंटे सोडविण्याचे काम करणारी संस्था आहे. त्याचे फायदे आयटकचा प्रतिनिधी सांगतो.

नंतर इंटकचा पुढारी येतो. जर घाटपांडेने आयटकला परवानगी दिली तर सरकारची घाटपांडेवर गैरमर्जी होईल असे सांगतो. शिवाय सेल्स टॅक्स, इन्कम टॅक्स, लेबर वेल्फेअर खाते यात घाटपांडेला होणारा त्रास याची जाणीव करून देतो.

घाटपांडेला भेटण्यास सामान्य माणूस येतो. त्याने सरळ



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

घाटपांडेंना दम द्यायला सुरुवात केली. तो सरळ म्हणतो, ''तुमचा पी. ए. मद्रासी असेल, मॅनेजर, दक्षिणी असेल आणि महत्त्वाच्या जागा तुम्ही अमराठी लोकांना देणार असाल तर तुमची धडगत नाही. तुमच्या कारखान्यात शेकडा नव्वद जागा मराठी लोकांनाच तुम्ही द्यायला हव्यात. जर त्यात काही गफलत केलीत तर तुमचा कारखाना चालवणं आम्ही अशक्य करू.[१४]'' या विधानावरून मराठी लोकांची होणारी कुचंबणा लक्षात येते. मराठी माणसांना कोणीही विचारत नाही. त्यांना नोकरी दिली जाते; पण तीही कमी दर्जाची असते. अमराठी लोक यांनी धंद्यात व नोकरीत सत्ता काबीज केली आहे. त्यामुळे मराठी लोकांना म्हणेल त्या पगारावर म्हणेल ते काम करणे भाग पडते. ही खंत यात चित्रित केली आहे.

यानंतर घाटपांडेला इन्कमटॅक्स अधिकारी भेटायला येतो. घाटपांडेकडे काळ्या बाजाराच्या पैशाविषयी चौकशी करतो. तेव्हा घाटपांडे हा मराठी माणूस वैतागतो आणि कारखाना काढण्याचा विचार सोडून देतो. त्यांचे कारखाना काढण्याचे स्वप्न अपुरे राहते. घाटपांडेने जी नोकरी नाकारली होती तीच नोकरी तो पत्करतो.

एकतर कारखान्यासाठी पैसा उभा राहत नाही तोपर्यंत त्यात नोकरी मागायला लोक व संस्था तयार होतात. त्यामुळे घाटपांडे वैतागतो. त्याचं कारखाना बांधण्याचे स्वप्न अपुरे राहते. याचे चित्रण या कथेत केले आहे. यातून एक भयंकर सामाजिक वास्तव आपल्यासमोर येते.

'आनंदी आनंद गडे' ही कथा तशी विनोदी असून साधी घटना चित्रित केली आहे. यामध्ये पेरू काढताना प्रोफेसराच्या हाताचे मनगट मोडते. त्यावेळी प्रोफेसरांना आलेला अनुभव या कथेत सांगितला आहे.

हाताचे मनगट मोडले यासाठी आनंद व्हायला हवा होता. असे सर्वांचे मत होते. हाताचे मनगट मोडले हे कळल्यावर उठणारे प्रश्न अगदी गंमतीशीरपणे रेखाटले आहेत. या कथेत हात मोडल्याचे अनेकांनी तर्क- वितर्क मांडले. त्यांपैकी जोगदंडांना वाटते पति - पत्नीमध्ये वादावादी झाली असावी. त्यावेळी हाताचे हाड मोडले असावे. बिदरकरांना वाटते की, प्रोफेसरांनी दारू घेतली असावी ; त्यामुळे हात मोडला असावा. हे तर्क संपतात ना संपतात तोपर्यंत कोणत्या डॉक्टराकडे प्रोफेसर गेले हा प्रश्न विचारतात. प्रोफेसर नांबराचे नाव सांगतात. नांबरबद्दल कोणाचेही मत चांगले नव्हते. त्यापेक्षा आपण वैदूकडे किंवा एखाद्या देवीचा अंगारा लावला असता तर बरा झालो असतो असे प्रोफेसरांना वाटते.

त्याच रात्री प्रोफेसरांना भयानक स्वप्न पडते की, त्याच्या भोवती हाडांचा ढीग पडला आहे. हातात करवती घेऊन, मोठे खिळे घेऊन, हातोडा घेऊन डॉ. नांबर समोर उभे आहेत आणि म्हणतात की, ``हं शोधा तुमचे मनगटाचं हाड म्हणजे ते मी नीट बसवून देतो.''

एखादी सामान्य घटना, त्यामधून होणारे तर्क- वितर्क व मानवी वृत्ती प्रवृत्तीचे गंमतीशीर चित्रण या कथेत केले आहे.

'बिल्वपत्र' या कथेत आलेला नायक दिगंबर हा कोकणस्थ आहे. पण वडलांची नोकरीत बदली झाली म्हणून दिगंबरचे कुटुंब उजवाडला येते. उजवाड हे एक खेडेगाव आहे. तेथे आल्यावर तेथील लोकांच्या राहण्याच्या, बोलण्याच्या, विचार करण्याच्या पद्धती वेगळ्या आहेत, हे दिगंबरच्या लक्षात येते. दिगंबरला उजवाडचे वातावरण, राहणीमान

वेगळे वाटते. दिगंबर उजवाडच्या शाळेत प्रवेश घेतो. त्यावेळी त्याला कोकणस्थ ब्राह्मण आहे म्हणून वर्गातील मुले चिडवतात. दिगंबरचे बोलणे नाकात होते म्हणून ती मुले नाकात बोलून त्याला त्रास देत. एवढ्या सर्व मुलांत एक मुलगा नेहमी शांत असायचा. तो म्हणजे 'गणेश' होय. गणेश व दिगंबर बुद्धीने तल्लख होती. दोघांचे मार्क्स थोड्या फार फरकाने पुढे- मागे होत. तरीही गणेश व दिगंबरची दोस्ती जमली होती. ती इतकी घट्ट होती की, एकमेकांना ते घरी बोलवत. गणेशाचे वडील आबा महाराज हे उजवाड मंदिराचे मठाधिपती होते. आबा महाराजांना दिगंबरने पहिल्यांदा बघितले. त्यावेळी दिगंबरचे त्यांच्याबद्दलचे मत चांगले नव्हते. दिगंबर गणेशच्या घरी जातो. त्यावेळी आबा महाराज दिगंबरचा पाणउतारा करतात. दिगंबरला आबा महाराज म्हणतात, "गणेश पास झाला काय किंवा नापास झाला काय त्याचं जन्मभर पोट भरेल इतकं आहे. शिवाय गणेशच्या वाट्याला पाच- दहा एकर जमीन येते." त्यामुळे त्याने (गणेशने) शिकावे असा आग्रह आबा महाराजांचा नव्हता. आबा महाराज गर्विष्ठ आहेत. दिगंबरला हिणवण्याचा एकही मोका ते सोडत नव्हते. आबा महाराज दिगंबरला म्हणतात की, "देशस्थाघरी वाया गेलेल्या अन्नावर कोकणस्थांचं एक कुटुंब जगेल हो.[१५]" त्यावेळी दिगंबरला आबांचा राग येतो.

गणेशसारख्या हुशार मुलाला आबा महाराज शिकवण्यापेक्षा ज्योतिष शीक म्हणतात. ज्योतिष शिकून मठाला तेवढे उत्पन्न तरी मिळेल. दिगंबर आबांना समजवण्याचा प्रयत्न करतो तर आबा म्हणतात की, "दिगंबरा, बाळा, ते सगळे नेमानेम असतात. तो समोरचा बिल्ववृक्ष

पाहिलास ? त्याची सगळीच पानं कुठे शंकराच्या मस्तकावर पडतात ? काही पायदळी तुडवली जातात. काही गाई गुरं खातात. जी ठरलेली असतील तीच तेवढी देवाच्या मस्तकी जातात. हे सगळं तिथं ठरलेलं असतं. त्यात बदल नाही होत.[१६]'' ह्या वाक्यावरून हे लक्षात येते की, आबा महाराजांना गणेशने पुढे शिकूच नये असे वाटते. त्याचा असणारा मठाधिपतीचा मान गणेशने पुढे चालवावा. गणेशने शिक्षण घेण्याऐवजी ज्योतिषी विद्या शिकावी ही आबा महाराजांची इच्छा आहे. गणेशला पुढे शिकायचे आहे हे माहीत असून दिगंबर काही करू शकत नाही. आबांचा विरोध असूनही गणेश पुढे शिकतो. दिगंबरच्या वडलांची बदली परत कोकणात होते. दिगंबर कोकणात जाऊनही त्याची व गणेशची दोस्ती तशीच टिकवतो. दिगंबर व गणेश त्यांच्या जीवनातील घडामोडी पत्राने एकमेकांना कळवितात. दिगंबर सी. ए. होतो तर गणेश संस्कृतमधून एम.ए.करतो.पीएच.डी.ला नाव नोंदवतो. त्यावेळी दिगंबरला वाटते की, गणेश आता प्राध्यापक होईल. तो अमेरिका, जर्मनीला राहील ; पण तसे काही होत नाही. या विरुद्ध घटना घडतात. गणेशचे दोन्ही भाऊ मरतात. त्यामुळे मठाची जबाबदारी गणेशने सांभाळावी असे आबा महाराजांना वाटते. गणेशचा मधला भाऊ निलू मरण पावतो. त्यावेळी 'मी मठ सांभाळीन' असे वचन आबांनी गणेशकडून घेतले. निलू मेल्यावर तेराव्या दिवशीच गणेशचा मठाधिपती म्हणून समारंभ होतो. गणेश दिगंबरला पत्र घालून बोलवून घेतो. दिगंबर मठात पोहचतो. त्यावेळी गणेशचे ओरडणे त्याच्या कानावर येते.

''चालू लागा इथून. माझ्या अंगाला हात लावलात तर हात मोडून टाकीन

तुमचे. मला सेवा नको नि चाकरी नको. हे सगळं तुम्ही लोकांनी का आणि काय चालवलं आहे याची कल्पना आहे मला....[१७]''गणेशला इच्छा नसताना केवळ आबा महाराजांच्या स्वार्थी स्वभावामुळे मठाधिपती व्हावे लागते. गणेशचा राग वरील विधानावरून व्यक्त होताना दिसतो. दिगंबर मठात आल्यावर आबा महाराज दिगंबरकडे विषारी नागाप्रमाणे बघतात.

या कथेत आबा महाराजांसारखी स्वार्थी वृत्तीची माणसे कोणाचाही विचार करत नाहीत हे दाखवून दिले आहे. आबा महाराजांना मठाधिपती होण्याची सत्ता आपल्या घराशिवाय कोणालाही (भाऊबंदकीत) मिळू नये असे वाटते. व यासाठी एका निष्पाप मुलाचा बळी देणारा स्वार्थी बाप या कथेत भेटतो. उजवाडच्या मठात अनेक अंधश्रद्धा आहेत. भूत उतरवणे, भोंदू प्रथा यावर विश्वास ठेवला जातो. सामान्य जनताही ह्याला बळी पडते. आबा महाराजांसारखे स्वार्थी लोक देवाच्या नावाखाली स्वत:चे पोट भरतात. तरुण मुलीचा उपभोग घेणारे देवळातील मठाधिपतींचे वास्तव चित्रण या कथेत केले आहे.

'राँग नंबर' या कथेतील नायक निखिल महाराष्ट्र टाइम्सचा बातमीदार आहे. निखिल हुशार आहे. एस. एस. सी. ला सत्त्याऐंशी टक्के मार्क्स होते. तरीही निखिल आर्ट्सला जातो. इंटरला इकॉनॉमिक्सला डिस्टिंक्शन मिळवतो. बी. ए. ला इंग्लिश विषय ठेवून विद्यापीठात सुवर्णपदक घेतो. नंतर जर्नालिझमचा कोर्स करतो. असा हा निखिल कर्णिक या कथेत भेटतो. एकच नोकरी पत्करुन त्यातच नोकरी करणे हे निखिलला आवडत नव्हते. त्याला नोकरीबाबत बंधने नको होती. त्याला नोकरीची काही कमी नव्हती. एक नोकरी सोडली

की दुसरी नोकरी लगेच त्याला मिळे. निखिल टाइम्स मध्ये नोकरीला लागून थोडे दिवस झाले होते. निखिलच्या डोक्यात कल्पना येते. आपण एवढे फिरलो, भेटलो तर आपण काहीतर लिहिले पाहिजे. त्यावेळी निखिल कादंबरी लिहिण्याचा विचार करतो. मग फ्रीलान्सिंगच्या अनियमित उत्पन्नावर निखिलचे भागणार नव्हते हे निखिलला माहीत होतं. याच गोष्टीचा निखिल विचार करत होता. इतक्यातच पोलिस जीप आणि टॅक्सी यांची टक्कर होते. त्यावेळी निखिलकडे कॅमेरा होता. त्याने फोटो काढून घेतले. या अपघातात पोलिसवाल्याची चुकी होती. पोलिसवाले निखिलला दमदाटी करतात. त्यावेळी निखिल टाइम्सचा बातमीदार आहोत म्हणून सांगतो. हवालदार सावंत निखिलकडे फोटोची मागणी करतो; तर निखिल त्याला नकार देतो. गाडीतून पी. एस. आय. उतरतो. निखिलला हवालदार सावंत धमकी देतो, " तो कॅमेरा इकडे आण नाहीतर तुला आत टाकतो." यावर पी. एस. आय. खवळतो. निखिल पी. एस. आय. ला म्हणतो ,"बोलू दे, बोलू दे त्याला. माझी बातमी चटकदार होईल. रॉंग साईडने जीप पुढे घालून टॅक्सीला धडक देऊन वर प्रेस रिपोर्टला अटक करू पाहणारे पोलिस .......[१८]" पी. एस. आय. निखिलला ही बातमी छापू नका अशी विनंती करतो. तरीही निखिल ही बातमी प्रेसला देतो. पण ह्या बातमीचे निखिलने फोटो काढले हे सांगण्याचे निखिल विसरतो. म्हणून निखिल परत प्रेसमध्ये फोन लावतो तर तो फोन रॉंग नंबर लागतो. त्यावेळी त्या फोनवर नाजूक आवाज येतो. निखिल परत त्याच फोनवर फोन लावतो. त्यावेळी गौरी शहाशी त्याचा परिचय होतो. गौरी शहा ही एक वकिल

आहे. पुरुष जातीबद्दल तिला राग आहे. गौरीच्या मनाविरुद्ध तिच्या घरच्यांनी तिचे लग्न लावून दिले होते. नवरा बिनकामी व व्यसनी मिळतो. गौरी तिच्या नवऱ्यापासून विभक्त राहते. गौरी वकिल झाल्यावर तिच्या नवऱ्याच्या तिने चिंध्या चिंध्या केल्या होत्या. गौरीसारख्या निष्पाप मुलींना फसविणाऱ्या पुरुषांबद्दल तिच्या मनात राग होता.

गौरी व निखिल यांची ओळख एका रॉंग नंबरमुळे होते. गौरीच्या बोलण्यावरून निखिल ती वकिल असावी असा अंदाज बांधतो. निखिल जी कादंबरी लिहीता होता त्याची पूर्ण माहिती गौरीला सांगतो. गौरीही त्या कादंबरीत गुंग होताना दिसते. प्रत्यक्ष गौरी व निखिल एकमेकांची भेट घेतात. त्यानंतर त्या दोघांची वारंवार भेट होते. गौरीच्या व निखिलच्या आवडी- निवडी एकसारख्या आहेत हे लक्षात येते. त्यावेळी निखिल गौरीला लग्नासाठी मागणी घालतो.

गौरीसारखी कर्तृत्ववान स्त्री या कथेत भेटते. पहिले लग्न अयशस्वी झाले तर ती खचून न जात नाही. पुरुषांच्याबद्दल तिचा राग व्यक्त होताना दिसतो. आयुष्य उद्ध्वस्त झाले म्हणून नशिबाला दोष देण्यापेक्षा पुढचे शिक्षण घेऊन स्वत:च्या पायावर उभी राहते. स्वत: वकिल झाल्यावर नवऱ्याला ती धडा शिकवते. अशी व्यक्तिमत्त्व असणारी गौरी शहा या कथेत भेटते.

'आय शॅल प्रे फॉर यू' या कथेतील टोनी ब्रॅगांझा हा एक कैदी आहे. वाईट प्रवृत्तीचा व स्वार्थी असणारा टोनी एक खलाशी आहे. टोनीच्या वाईट कृत्यांची शिक्षा म्हणून त्याला फाशीची शिक्षा दिली गेली असली तरी त्याला त्याचे काही वाटत नाही. फादर जॉन कैदेत

असणाऱ्या लोकांना भेटण्यास तुरुंगात जातो. त्यावेळी तिथल्या कैद्यांसाठी तो प्रार्थना करतो. टोनी खलाशी होता त्यामुळे त्याचे संबंध वाईट प्रवृत्तीच्या लोकांबरोबर येतात. टोनी गुन्हेगार बनतो. फादरला म्हणतो, ''मृत्यूशी माझा संबंध आहे. सिंगापूरला एकदा नि हाँगकाँगला दोनदा मी चक्क गँगवारमध्ये ओढला गेलो होतो. मजा येते फादर मजा येते. हातात भरलेलं शस्त्र असलं म्हणजे काय वाटतं सांगू ? असं वाटतं की, आपण या क्षणी जगाच्या माथ्यावर उभे आहोत.''या वाक्यावरून असे लक्षात येते की, टोनीला त्याच्या वाईट कृत्याबद्दल काही वाटत नाही ;तर त्याला त्याचा अभिमान वाटतो आहे. एक गर्विष्ठपणाची भावना टोनीच्या ठिकाणी दिसते. टोनीला फाशीची शिक्षा झाली हे समजताच तो म्हणतो की, ``तुम्ही टोनीला नष्ट करू शकाल पण त्याचे असणारे वंशज ते मागे राहतील.'' टोनीने अनेक स्त्रियांना फसविले आहे. टोनीने व्हेनिसमध्ये असताना एका मुलीला फसविले होते.ही गोष्ट तो अभिमानाने सांगतो. त्या मुलीला धंद्याला लावलं हेही सांगतो.

फादर जॉनला त्यांचा भूतकाळ आठवतो. जॉनची मैत्रीण लिझा हीची त्यांना आठवण होते. तिच्याबाबतीत अशीच घटना घडली होती. फादर जॉन धर्मगुरूचे शिक्षण घेण्यासाठी बाहेर जातात. त्यावेळी लिझाचा विवाह एका खलाशाबरोबर होतो. तो खलाशी चांगला नव्हता. लिझाच्या जीवनाची वाताहत होते. ती नर्स झाली होती. लिझाचा नवरा व टोनी ब्रॅगांझा सारख्या स्वभावाची असतील यात काही शंका नाही. स्वत:च्या वाईट कृत्याबद्दल काहीही न वाटणाऱ्या अत्यंत तामसी प्रवृत्तीच्या लोकांचे चित्रण येथे केले आहे.

टोनी कितीही वाईट वागत असला तरी फादर जॉन त्याच्या बद्दल देवाकडे प्रार्थना करतात. टोनीला शेवटच्या दिवशी भेटायला येतात. त्यावेळी त्याचे मानसिक संतुलन बिघडते. त्याने रात्रभर दंगा घातला होता. फादरला तो म्हणतो, ``फादर, तुम्ही माझ्यासाठी प्रार्थना करा." फादरला स्वत: सांगतो की, ``मी ख्रिश्चन म्हणून जन्मलो आणि ख्रिश्चन म्हणूनच मरणार; पण मधलं आयुष्यभर मी जगलो तो एक माणूस म्हणून जे जे सुख हवं होतं, तितकं सुख हिसकावून मिळविलं.'' टोनीला फाशी दिल्यावरही फादर टोनीसाठी प्रार्थना करतात. सत्प्रवृत्तीचा फादर या कथेत भेटतो.

'चेहरा' ही एक करुण कथा आहे. 'फ्लोरिडा टाइम्स' या वृत्तपत्राचा टोनी फ्रेझर हा 'रिजन' विभागाचे काम बघणारा तरुण आहे. टोनी उध्दट असला तरी त्याचे लिखाण, कल्पना चांगल्या होत्या. तो वृत्तपत्रासाठी वेगवेगळ्या कल्पना राबविण्याचा प्रयत्न करतो. त्याची वृत्तपत्राबद्दलची तळमळ दिसून येते. वत्तपत्रासाठी त्याने नवीन कल्पना योजली होती. ती अशी, ज्यांनी ज्यांनी कलेच्या, ज्ञानाच्या, बुद्धीच्या, संशोधनाच्या, स्पर्धेच्या राजकारणात, समाजकारणात इ. क्षेत्रांत विशेष कामगिरी करून फ्लोरिडाचे नाव उज्ज्वल केले अशा लोकांच्या स्मृतींना उजाळा द्यायचा. ही कल्पना नवीन असल्याने त्या कल्पनेला प्रतिसादही चांगला मिळतो. व्यक्ती प्रसिद्धीच्या झोतात आहे तोपर्यंत ती लक्षात राहते पण नंतर तिला कसे जीवन जगावे लागते हे शोधून काढण्यासाठी 'फ्लोरिडा 'या वृत्तपत्राने ही कल्पना राबविली होती.

सौंदर्य स्पर्धेतून विजयी झालेल्या ग्लोरियाचे पुढे काय झाले

याचा शोध टोनी घेतो. प्रथम ग्लोरियाच्या कुटुंबाची माहिती मिळवतो. ग्लोरिया ही पामेला व निगेल यांची एकुलती एक मुलगी होती. निगेल (वडील) वारल्यानंतर शेती कसणार कोण ? हा प्रश्न पामेलापुढे होता. पामेलाच्या शेजारी बर्डिन नावाचे कुटुंब राहत होते. त्या कुटुंबातील पॉल हा मुलगा पामेलाची शेती कसतो. ग्लोरिया व पॉल एकमेकांवर प्रेम करतात; पण पुढे कथा वेगळया वळणाने जाताना दिसते. येथे कथेला कलाटणी मिळते.

ग्लोरिया सौंदर्यस्पर्धेत भाग घेते. तिला त्या स्पर्धेत यशही मिळते. त्या यशाने ग्लोरिया भारावून जाते. ग्लोरियाला शहराची ओढ लागते. एका प्रकारे शहराचे आकर्षण तिला वाटते. ग्लोरियाचे मत असे होते की, पॉलने ग्लोरियाबरोबर शहरात जावे,मात्र पॉल नाही आला तर ग्लोरियाचे काही बिघडत नव्हते. ग्लोरियाच्या मनात आईविषयी चिंता वाटत नाही. आईचा विचार ती करतच नाही. ग्लोरियाच्या मनस्थितीचे चित्रण लेखकाने समर्थ शब्दात केले आहे.

टोनी फ्रेझर पॉलला जाऊन भेटतो. ग्लोरियाची आणखी माहिती मिळते का हे पाहतो. पॉल फ्रेझरला सांगतो, 'ग्लोरियाची आई वारली.' ग्लोरियाच्या आईने कागदपत्रातील केल्याच्या तरतुदी सांगतो. ग्लोरियाची सर्व जमीन पॉल कसतो आणि ठरावीक रक्कम पॉल ग्लोरियाच्या नावावर टाकतो हे ऐकून टोनी आश्चर्यचकित होतो. या जगात स्वार्थी माणसांप्रमाणे, नि:स्वार्थी व प्रेम करणारीही माणसे अजून आहेत हे टोनीला पटते.

**'झुंज'**

या कथेत कामगार समस्या रेखाटली आहे. एकमेकांच्याबद्दल कुरघोडी करणाऱ्या लोकांची ही झुंज आहे. कोण श्रेष्ठ, कोण कनिष्ठ या झुंजीत सामान्य कामगार भरडला जातो याचे चित्रण या कथेत केले आहे.

ज्योस परेरा यांची प्रॉडक्शन चीफ म्हणून नेमणूक होते. ज्योस परेराला आई-वडील नव्हते. त्यांचे शिक्षण चर्चच्या पैशातूनच पूर्ण झाले होते. चर्चच्या माणसाच्या मदतीने ज्योस परेराला एम.टेक. करण्यासाठी परदेशी जाण्याची संधी मिळाली होती. प्रसिद्ध कारखान्यात प्रॉडक्शन चीफ म्हणून त्याने नोकरी पत्करली. त्यावेळी ज्योस परेराला कंपनीतील गोंधळ ऐकून माहीत होता. परेराचा पी. ए. भन्साळी याच्याकडून त्याने माहिति गोळा करून घेतली. प्रॉडक्शन विभागाचे सर्व सीआर्स परेराने तपासले. त्यात तुकाराम परबची माहिती मिळते.

तुकाराम परब हा प्रॉडक्शन सुपरवायझर होता. कामगार पुढारी, कामगारांवर तुकारामचा दरारा होता. त्याचे जहाल वक्तृत्व, सैल नीतिमत्ता आणि मद्याचे व्यसन ह्याची माहिती परेराला मिळते. परबवर अनेक आरोप होते. प्रतिस्पर्धी पुढाऱ्यांचे कट करून काटे काढल्याचा संशय होता. एकाला अमानुष मारहाण केली होती. एकाच्या अंगावर ॲसिड फेकले होते. एकाला ब्लॅकमेल केले होते. असा हा तुकाराम परब या कथेत भेटतो.

तुकाराम परब व परेरा यांची पहिली ओळख प्रॉडक्शन विभागाच्या मीटिंगला गेल्यावर होते. त्यावेळी परब सरळ म्हणतो की, "कंपनीकडे कामगारांना बोनस द्यायला, पगार द्यायला पैसा नसतो. तरीपण बड्या पगाराचे अधिकारी नेमले जातात." असा सरळ सवाल करतो. यावरूनच

त्याचे व्यक्तिमत्त्व लक्षात येते.

मीटिंग संपल्यावर परेरला परब म्हणतो, ''शेक हँड्स् प्लीज, रागावू नका हं, आमचं पुढारीपण टिकवायचं म्हणजे अशी जहाल भाषा आम्हांला करावीच लागते. कामगारांची माथी कशी असतात ते तुम्हांला ठाऊक असणारच. मी मीटिंग मध्ये आवाज उठवला नाही तर मी साहेब लोकांचा चमचा झालो असं माझे प्रतिस्पर्धी कामगारांना पटवतील. फार वाईट असतं हे जग, साहेब. एकीकडे युनियन सांभाळायची आणि एकीकडे वरच्यांशी मिळून घ्यायचं म्हणजे त्यात आमचं मरण........[१९]'' यातून त्यांचा दुटप्पी, ढोंगी स्वभाव दिसून येतो. तसेच हे एक राजकारणी व्यक्तिमत्त्व आहे, हे लक्षात येते.

परब सत्तेवर होता तर दुसरा गट म्हणजे मथाईचा होता. या दोन्ही गटांत नेहमी वाद होत. पण मथाई हा तसा शांत डोक्याचा होता. परबने कंपनीचा करार संपण्याच्या अगोदरच कामगारांच्या मागण्यांचे लेखी निवेदन व्यवस्थापकांकडे दिले. त्यासाठी एक दिवसाचा लाक्षणिक संप केला जाणार होता. कामगारांची सभा झाली त्यात परबने अत्यंत प्रक्षोभक भाषणे केली. परबने त्याच्या वक्तृत्व शैलीने कामगारांवर भुरळ पाडली तर मथाईने ती भुरळ त्याच्या मुद्देसूद भाषणाने पुसून टाकली. दोन गटांतील या झुंजीत सामान्य कामगारांचे हाल होते. सत्ता संघर्षाचे चित्रण या कथेत आले आहे. वास्तवचित्रण लेखकाने या कथेद्वारे केले आहे.

'कालिया' या कथेत साप या प्राण्याविषयीचे तपशीलवार चित्रण केले आहे. 'अंगब्याचे अरण्य' याचे वर्णन या कथेत आले आहे. जंगली

जीवनाचा एक वेगळा अनुभव देण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. सापाविषयीचे वर्णन त्याच्या कथेत येतेच. सापाने अंडी घातल्यापासून ते पिलांना जन्म देण्यापर्यंत सापाचे आयुष्य कशा प्रकारचे असते ते 'कालिया ' कथेत दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. कालिया व लांड्या साप यांच्यातील युद्ध, त्या युद्धात जो जिंकेल त्यालाच मादी मिळणार होती असे प्राणी जीवनही व त्यातील काही संकेत येथे पाहवयास मिळतात. निसर्गाचे विविध पैलू मांडले आहेत.

'हाक' ही कथा हुव्वाप्पा नावाच्या तरुणाची आहे. त्याचा धंदा म्हणजे साप पकडणे. त्याच्या वडलांचा म्हणजे इराप्पाचाही तोच पारंपरिक व्यवसाय होता. इरप्पा हा इरसाल बेरकी माणूस होता. इरप्पाने हुवाप्पाला साप कसा पकडावा ही विद्या शिकवली नाही. कारण काय तर हुव्वाप्पा व त्याची आई इरप्पाला आवडत नव्हती. इरप्पाची पत्नी ही त्याच्याच मामाची मुलगी होती. त्या मामाने इरप्पाकडून लेकीला आयुष्यभर सांभाळीन असे वचन घेतले. तशी मिरगाई देवीपुढे शपथ घेतली होती. हुवाप्पाची आई काळी कुरूप होतीच ; पण बुद्धीने मंदही होती. एक गोष्ट तिला दहा- दहा वेळा सांगावी लागे, तरी तिच्या डोक्यात ती गोष्ट शिरत नव्हती. इरप्पाच्या आयुष्याला चिकटलेली घोरपड असे वर्णन लेखक करतो. इरप्पाचा मुलगा हुवाप्पा हा त्याच्याच आईसारखा होता.

इरप्पाला बायको व मुलगा यांची चीड येते. आयुष्याला चिकटलेले दोन कुरूप शाप असे इरप्पाला वाटे. अस्वलाप्रमाणे पक्की मिठी मारावी तसे कुरूप बायकोने त्याचे आयुष्य वेढून टाकले होते आणि अजगराप्रमाणे त्याला विळखा घालून ती बथ्थडपणे जगत होती.

इरप्पाने कंटाळून तीनदा घर सोडून जाण्याचा प्रयत्न केला होता. तो बायकोला म्हणतो, "नको तुझं घर, नको तुझं सोनं, माझ्या हातात विद्या आहे. मांडीएवढे मोठे भुजंग मनगटात खेळवण्याचं माझ्यात सामर्थ्य आहे.[२०]" अशा घमेंडीत इरप्पा बोलत होता. इरप्पा घर सोडून जात होता, पण व्यसनाला पैसा पुरला नाही की लगेच बायकोकडे परत येत होता.

पुढे इरप्पा वारतो. हुव्वाप्पाला घरची जबाबदारी सांभाळावी लागते. हुव्वाप्पाच्या बरोबरीच्या सर्व पोरांची लग्ने होतात. त्यामुळे हुव्वाप्पाला त्याच्या लग्नाची काळजी लागते. हुव्वाप्पाला कोण मुलगी देत नाही. कारण त्याच्याकडे संपत्ती नाही. शिवाय तो काळा होता, देखणा नव्हता. त्याची सर्व लोक चेष्टा करतात. त्यावेळी तो तिरस्काराने थुंकतो. मनाशीच बोलतो , "माझ्या खिशात चार पैसे असते तर मला कुणी हसलं नसतं. मला आपली मुलगी देण्यासाठी मी मी म्हणत चार लोक पुढं आले असते; पण त्या हरामखोराने जुवा खेळून, सगळं घालवलं नि आता स्वत: नरकात गेला. "[२१] बापाबद्दलचा राग या विधानावरून व्यक्त होताना दिसतो.

हुव्वाप्पाला त्याच्या शेजारी राहणारा भीमाप्पाची भाची शांतव्वा आवडते. हुव्वाप्पा लग्नासाठी भीमप्पाला विचारतो. त्या मुलीला विचारून पाहतो असे भीमाप्पा सांगतो. भीमाप्पा हुव्वाप्पापुढे शर्त ठेवतो की, "काहीतरी अचाट करून दाखव." भीमाप्पा म्हणतो माणसाकडे पैशाची थैलीतर लागते.नाहीतर पराक्रम तर असावा लागतो. " तू असं अचाट काही तर करून दाखव मी पोरीची समजूत काढतो." असे भीमाप्पा

समजूत काढतो.'' असे भीमाप्पा हुव्वाप्पाला सांगतो. काहीतरी वेगळे करून दाखवायचे म्हणून तो पाच फड्यांचा भुजंग पकडायला जातो. तो भुजंग हुव्वाप्पाला चावतो. त्यात हुव्वाप्पाला मरत येते. ज्यावेळी भुजंग हुव्वाप्पाला चावतो त्याचे वर्णन लेखकाने केले आहे ते पुढीलप्रमाणे-

''त्याच्या पोकळ दातातून विषधार हुव्वाप्पाच्या रक्तात रिती होत राहिली. त्याचे विळखे अधिकाधिक घट्ट होत राहिले. हुव्वाप्पाचा श्वास कोंडत गेला. रक्ताच्या गुठळ्या होऊ लागल्या तरी भुजंग त्याला डसतच होता. उन्मळलेल्या केळीप्रमाणे हुव्वाप्पा खाली पडला.[२२]'' हे प्रत्यक्षदर्शी वर्णन हे या कथेचे आणि प्रस्तुत लेखकाच्या सर्वच लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

'आश्रित'या कथेतील नायक जयवंत याची इन्कमटॅक्स खात्यात क्लास वन ऑफिसर म्हणून निवड होते. जयवंत ज्या गावी लहानाचा मोठा झाला त्या गावात जहागीरदाराचा वचक होता. जयवंतचे वडील दादा हे जहागीरदारकडे नोकरीला होते. त्यामुळे दादांच्या ठिकाणी स्वामिनिष्ठता दिसून येते. जहागीरदार म्हणतील तसेच वागायचे. दादांचा मुलगा पास झाला, बोर्डात आला. याचे त्यांना कौतुक वाटायचे नाही; तर जहागीरदारांची मुलगी उषा एस. एस. सी.ला पास झाल्याचा त्यांना आनंद होई. उषा राजेंच्या वडलांनी जयवंतला पुढच्या शिक्षणासाठी मदत केली होती. उषा राजे लहान होत्या त्यावेळी ती जयवंतला आपल्याला पाहिजे तसे नाचवत होती. त्यामुळे तिचा राग जयवंतला येई. जयवंतला इच्छा नसताना तिच्याबरोबर खेळायला लागे. पुढे जयवंत

शिक्षणासाठी परदेशात जातो. जेनशी जयवंतची ओळख होते. जेन बरोबर लग्न करतो. गावाकडची परिस्थिती बदलली, आईवडील वारतात. उषा राजेंचा विवाह झाला. उषा राजेचे वडील वारले. त्यानंतर त्या गावी जाण्याचा जयवंतचा संबंधच आला नाही.

जयवंत इन्कमटॅक्स खात्यात असल्यामुळे त्याला छापे टाकण्यासाठी धनेश देसाई ह्यांच्या उद्योगावर छापा टाकायचा होता. धनेश देसाई यांचे उद्योग व्यवसायात फार मोठे नाव होते. इंपोर्ट, एक्स्पोर्ट, नायलॉन्स आणि दोन गिरण्या असे धनेशच्या व्यवसायाचे जाळे होते. देसाई उद्योगावर धाड घालण्यासाठी पूर्ण माहिती काढून त्या उद्योगाच्या बाबतीत बारीक - सारीक तपशील मिळवण्याच्या कामाला तो लागला. यात जयवंतला उषा राजेंची माहिती मिळाली. उषा राजेंचा पहिला विवाह यशस्वी ठरत नाही. उषा राजे पतीपासून घटस्फोट घेतात आणि आता धनेशचे व उषा राजेंचे संबंध निकटचे होते. खंडाळ्याला उषा राजेंची बंगली होती. याच बंगलीवर जयवंत धाड टाकतो. त्यावेळी उषा राजे बाहेर गेल्या होत्या. त्या खंडाळ्यातील बंगलीवर येतात. एकाच जागी बसून होत्या. त्या ज्या सोफ्यावर बसल्या होत्या त्या सोफ्यात चोरटा खण होता. त्यात टेलिफोन नंबर्स लिहिलेली छोटी डायरी होती. ती जयवंतला सापडते. उषा राजे जयवंतला केलेल्या उपकारांची जाणीव करून देते, जयवंतला डायरी द्यायला उषा भाग पाडते. जयवंत लाच घेणार नाही हे माहीत असताना त्याला (जयवंतला) त्याच्या लग्नाची भेट म्हणून पाऊण लाखाचा हार देते. आहेर आहे असं समजा उषा म्हणते. उषा राजे जयवंतला म्हणते लग्न मीही केलं जयवंतराव, तुम्हीही मला

आहेर देऊ शकता, तिने हात पुढे करताच तिला काय हवे आहे हे जयवंतला कळून चुकते. तो ती डायरी तिला देतो. त्यावेळी जयवंतला वाटते. जहागीरदाराच्या ऋणातून सुटण्याचा क्षण आला आहे. ती काळी डायरी जयवंत उषाला देतो. पण जयवंतला ही गोष्ट अस्वस्थ करते. उषाला फोन लावून तुझा आहेर मी परत करणार आहे म्हणून सांगतो जर जयवंतने तसे केले नाही तर त्याला सतत वाटेल की, आपण गरजू आणि आश्रित आहोत.

जयवंतसारखी भ्रष्टाचार न करणाऱ्या व प्रामाणिक व्यक्ती या कथेत भेटते. त्याचप्रमाणे आपण केलेल्या उपकाराची जाणीव करून देऊन आपणास हवे ते मिळविण्याचा प्रयत्न करणारी उषा भेटते. जयवंतला जहागीरदाराचे ऋण तर फेडायचे आहे आणि दुसऱ्या बाजूला त्याचा प्रामाणिकपणा त्याला तसे करू नको म्हणून सांगतो आहे. यात जयवंतची होणारी कोंडी या कथेत येते. प्रामाणिकपणाचा विजय होतो.

**'तोलरेघ'**

या कथेत शेतकरी जीवनाचे चित्रण केले आहे. लांड्या सापाने श्याम्या बैलाला दंश केला. त्यामुळे बैल मरण पावतो. बाबाजीला फार वाईट वाटते. बाबाजीचा इतका चांगला बैल मरतो. जो लांड्या साप श्याम्या बैलाला ढसला होता त्या सापाला शोधून तो मारतो. या कथेत अनेगावाचे वर्णन आले आहे. शेतात राब घालून तो पेटवून देऊन शेती केली जाते. शेतीची एक पारंपरिक पद्धती या कथेत दाखविली आहे. बैल मरणे ही शेतकऱ्याच्या जीवनातील दु:खद घटना आहे, हे येथे दाखवून दिले आहे. शेतकऱ्याला येणाऱ्या अडचणींचे चित्रण या कथेत

केले आहे. ही कथा प्रामुख्याने आणि नेमकेपणाने कृषिजीवन चित्रित करते. प्रस्तुत लेखकाच्या कथांमध्ये वातावरणातील विविधता व व्यक्तिचित्रणातील विविधता आढळते. अगदी सामान्य शेतकऱ्यांपासून, मोठमोठ्या ऑफिसरपर्यंत वेगवेगळया स्तरातील माणसे त्यांच्या कथांत भेटतात. त्यामुळे त्यांच्या कथा एकसुरी वाटत नाहीत. मानवी जीवनातील वैविध्यतेने अनंत मनोहर यांच्या कथा रंगलेल्या आहेत म्हणूनच त्या वास्तवदर्शी आणि जिवंत वाटतात.

'साखरेचे खाणार' या कथेतील नायक अविनाश पतंगे हा हुशार तरुण आहे. हजरजबाबी आहे, विनोदी आहे. अवी मित्राच्या म्हणजे राघवच्या घरी राहतो. राघवच्या घरी राहून राघवचीच कपडे, स्नो, पावडर वापरतो व नोकरी शोधण्यासाठी राघवचेच पैसे घेऊन जातो. अविनाश हा बोलका आहेच. कोणत्याही विषयावर तो बोलू शकतो. अवी नोकरी या विषयावर कितीही तास बोलू शकला असता कारण त्याने जाहिराती वाचल्या होत्या. एक जाहिरात भुस्कुटे ॲन्ड भुस्कुटे कंपनीची होती. त्यात पी. ए. ची जागा खाली होती. भुस्कुटेच्या अटी अशा होत्या की, पी. ए. ला उत्तम इंग्रजी यायला हवे. फाड फाड बोलता यावे, मुलगा तरुण व देखणा हवा. अविवाहित असेल तर उत्तमच. ही जाहिरात वाचून अवी भुस्कुटेच्या कंपनीत जातो. भुस्कुटे वेळेवर येत नाहीत. त्यामुळे अवी चिडतो. अवी मुलाखतीला जाताना टाईट पँट, डोक्यावरचे केस मानेपर्यंत, नवीन पद्धतीने कल्ले बरेच खाली सोडलेले असा वेष करून जातो. त्याला पाहून भुस्कुटे म्हणतात, "नाना, तुम्ही बरोबर जाहिरात दिली होतीत ना ? मला पी. ए. हवा आहे, नट वगैरे नको आहे."

यावर अवी चिडतो. एकतर भुस्कुटे उशिराने मुलाखत घ्यायला आले. त्यात अवीचा पोशाख बघून त्याला बोलतात. भुस्कुटे व अवी यांचा वाद होतो. ऑफिसमध्ये काम करणारी मुलगी सारखी अवीकडे बघते. ती बकुल भुस्कुटेची कन्या आहे. हे अवीला माहीत नव्हते. बकुल मैत्रिणीकडे जाताना परत अवीची व तिची भेट होते. भुस्कुटे कुटुंबीय अवीला जावई म्हणून स्वीकारतात. भुस्कुटे अवीने पी. ए. व्हावे हे प्रपोजल मांडल्यावर तो नकार देतो. अवीने एका कंपनीत नोकरीसाठी अर्ज टाकला होता. त्यानंतर मुलाखत झाली होती. त्या कंपनीचा अवीला कॉल आला होता. दहा वर्षांचा करार होता. त्यामुळे भुस्कुटेची ऑफर अवी नाकारतो. अवी चाळीत येऊन बॅग भरतो तोच बकुल त्याच्या मागून येते. त्याला म्हणते,

"ए थापाड्या, कुठं चाललास ?"

"अवी, तू थापाड्या आहेसच, पण पळपुटाही आहेस. मला सोडून आफ्रिकेत पळून जात होतास ? वेड्या, आफ्रिकेलाच काय; पण उत्तर ध्रुवावर गेलास तरी तुझा पाठलाग करीन मी, एकटा जातोस होय ?"

या कथेतील अविनाश हा बेरकी व्यक्तिमत्त्व असणारा तरुण या कथेत भेटतो. आपल्यावर आलेले संकट दुसऱ्यावर घालणाऱ्या अवीचे विनोदी पद्धतीने चित्रण केले आहे. अवी त्याच्या बुद्धीच्या चलाखीच्या तालावर सर्वांना नाचवतो.

'पोटासाठी भटकंती जरी' या कथेत वास्तवता रेखाटण्याचा प्रयत्न लेखकांनी केला आहे. या कथेतील प्रा. ठोके सरांचे मन विद्यादान करण्यासाठी उत्सुक असते पण कॉलेजमध्ये त्यांना चांगला प्रतिसाद

मिळत नाही. प्रा. ठोके यांना आपण शिक्षण घेण्यासाठी किती कष्ट केले याची जाणीव आहे; पण कॉलेजमधील शिक्षकापासून ते विद्यार्थ्यांपर्यंत गैरव्यवहार त्यांना आढळतो. त्यामुळे ठोके सर नाराज होतात. ठोके सरांना प्रश्न पडतो की, आपण एवढे कष्ट केले, प्राध्यापक होण्यासाठी. कॉलेजमधील युवक लेक्चरला बसत नाहीत, निवडणुकीत दंगा असतो, अभ्यासात त्यांचे लक्ष नसते. अशा मुलांना शिकविण्यात काही अर्थ नाही. म्हणून इतर प्राध्यापक नुसती सही करून त्यांचा पगार घेतात. काही मुले अशीही आहेत की, त्यांना इच्छा असून आर्थिक मदत नाही. त्यामुळे अशी मुले नोकरी करून शिकतात. कॉलेज म्हणजे पैसा मिळविण्याचा धंदाच झाला आहे असे प्रा. ठोकेंना वाटते. प्रा. ठोकेंच्या कॉलेजमध्ये अॅडमिन्स होतात त्या फक्त कागदावरच. प्रत्यक्षात मुले कॉलेजात येतात की नाही हे पाहणार कोण ? मुलांच्या चुकीवर पांघरूण घालणारे प्राध्यापक व इतर लोक या कथेत भेटतात.

ज्या लोकांनी कॉलेजे उभी केलीत ते लोक समाजाची फसवणूक करतात. कारखानदार लोकांना फसवून पैसा उभा करतात. सेल टॅक्सचे लफडे कसे सोडवायचे ? पोती विका पण त्याचा सेल दाखवूच नका असे गैरवर्तन असणारे स्वार्थी कारखानदार या कथेत भेटतात.

प्रा. ठोके सरांना वर्गात 'विरहतरंग' ही कविता शिकवताना घाम फुटतो. कारण ह्या कॉलेजमधील मुले उद्धट वागणारी आहेत. त्यांना शिकवणे म्हणजे जोखमीचे काम आहे हे प्राध्यापकांच्या लक्षात येते.

''हातात येणारा अमाप पैसा. पालकांचे नियंत्रण नाही. बऱ्या वाईट मार्गाने हातात पदवी आली की, बसायला बुलेट, दर दिवसाआड शहरात

फेरी, चैन करण्यासाठी खिसे भरलेले. कॉलेज काय नि सरपंची काय, सत्तेची स्थाने विकत घ्यायची. आपल्या हाताखालून जाणारे हे विद्यार्थी म्हणजे उदयाचे ग्रामीण नेतृत्व." यातून आजच्या तरुण पिढीवर लेखकाने भाष्य केले आहे.

प्रा. ठोक्यांना आपण दुबळे आहोत, फार लहान आहोत याची जाणीव होते. पण काय करणार ,पोट भरायला तर हवे. म्हणून ही नोकरी करावी लागते.

या प्रस्तुत कथेतून वास्तवता जाणवतेच; त्याचबरोबर शिक्षणामध्ये कारखानदारांचा, राजकारणी लोकांचा झालेला शिरकाव दिसून येतो. शिक्षणप्रणाली भ्रष्ट झाल्याचे दिसते. प्रा. ठोकेंसारखे प्राध्यापक पहिल्यांदा या गोष्टींचा विचार करतील. नंतर त्यांचेही मन इतर प्राध्यापक लोकांसारखे निबर होईल. आणि यातून एकूण समाज व्यवस्थाच बिघडून जाईल, असे एक चित्र येथे रेखाटलेले आहे.

'गणराय रंगी नाचतो' या प्रस्तुत कथेत दोन पिढ्यांतील अंतर दाखविले आहे. अनया भावे ही भारतीय स्त्री अमेरिकेत कुटुंबाबरोबर वास्तव्य करणारी आहे. पण भारतीय रीतिरिवाज, परंपरा याचा आदर राखणारी, त्या रूढी जपणारी आहे. अनयाची मुले ह्या प्रथांना 'फनी' म्हणतात. एका गणेश चतुर्थीला अनयाचा मुलगा विकी घरी फिरकला नव्हता. त्याचा अनयाला भरपूर राग येतो; पण ह्यावेळी कोणी येवो नाहीतर राहो आपण देवाची पूजा मांडायची असा विचार अनया करते. पण विकी घरात देवाची पूजा मांडून अनयाला गोड धक्का देतो. ह्यामुळे

अनया भारावून जाते.

**'देवकाठी' आणि 'बिल्वपत्र' यातील अभिव्यक्ती सामर्थ्य.**

**१) भाषा शैली-**

या प्रस्तुत कथांतून येणारी पात्रे ही गावरान आहेत. तर काही उच्चशिक्षित आहेत. त्यामुळे पात्राला शोभेल अशीच भाषा लेखकाने अभिव्यक्तीसाठी वापरली आहे. काही ठिकाणी हिंदी भाषिक लोकांच्या तोंडची भाषा जशीच्या तशी कथेत वापरली आहे. त्यामुळे कथा जिवंत वाटते. उदा. 'दास' (देवकाठी) या कथेतील शेटजींची भाषा पुढीलप्रमाणे आहे: "अने एक बात भुलू नको. तुमी काठियावाडचे किंग कमरेला कट्यार लावल्याबिगर तुमी कधी नाय राहेल." [२३] प्रधानाचे नाटकातील काम चांगले झाले. प्रधानाला तंग होणारी सुरुवात उतरवताना त्रास होतो. त्यावेळी शेठजी कपाळाला आठ्या घालून म्हणाले, "प्रोडक्शन म्यानेजर कोण ? च्यावला काय ? ए रमेश च्यावला, हामचा जोरावरसिंग भाड्याने उसने कपडे नाय पेहेनेल. कालेवख्त जोरावरसिंगला समदे नवे कपडे शिवूनशी घे. क्याशरकडून तुला काय लागेल ती क्याश घे. तो नाय नाय म्हणेल आणि तो चिन्नूस्वामी ओब्जेक्शन घेल तर त्याला हामी फायर करेल अने हे पगारी नाय च्यालेल बाबा. नारिंगी पगरी घालेल जोरावरसिंग..............." [२४]

भाषेत काही ठिकाणी आदबशीरपणा आला आहे. बोलण्याच्या वेगवेगळ्या तऱ्हा आहेत. नाटकात वापरली जाणारी बोजड भाषा काही वेळेला पात्रांच्या तोंडून अभिव्यक्त होताना दिसते. उदा. अखेरची भूमिका (देवकाठी) देवदत्त शरयूला म्हणतो, "असंच असतं, माणसाला



SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आपले गुणच माहीत नसतात. शरयूदेवी, आपण एक ना एक दिवस फार मोठ्या होणार आहात. आपले गुण मी ओळखतो. कस्तुरीमृगाला तरी कस्तुरी आपल्याजवळ आहे हे कुठं माहीत असतं ?'' [२५] काही कथांमध्ये गावरान भाषा येते. विशिष्ट हेल काढून बोलले जाते. (उदा. तोलरेघ (बिल्वपत्र) यातील संवाद या दृष्टीने महत्त्वाचा आहे. तो पुढीलप्रमाणे-

''कोंड्ये, झाड कुनाचं हाय बाई ?''

''आं ? आसंल फलान्या बिस्तऱ्याचं.''

''म्हंजी तुला म्हाईत नाय म्हन की. ''

''आसंल चंदररावाचं.''

''मग आता तू तुज्या पायानी खाली येनार का ?''

''व्हय व्हय. उतरते की.''

''कोंड्ये, किती उतारलंस आंबं ?''

'नाय आत्ता हीच चडले मी ती. आबं उतराय टायम तरी मिलला ?' [२६]

या संवादावरून ही भाषा कोकणची आहे हे लक्षात येते. भाषेला जिवंतपणा आणण्यासाठी निवेदन करताना गावरान भाषा वापरली आहे. शाम्या बैल मरण पावतो त्याचे वर्णन करताना आलेली भाषा. उदा. तोलरेघ (बिल्वपत्र) ''त्या रात्री तोंडाला हिरवाचार फेस येऊन बाबाजीचा शाम्या बैल पाय आखडून मरण पावला.'', [२७] भाषेत लयबद्धता आणण्याचा प्रयत्न लेखकांनी केला आहे. उदा. तोलरेघ (बिल्वपत्र)''पायातला जाडजूड वहानाचा करकर आवाज झाला.'' [२८]

## २) प्रतिमा- प्रतिकांचा वापर -

देहाची पिशवी, एकटेपणा विसण्यासाठी मद्य भरण्याचा, अन्न कोंबण्याचा कंटाळा येणे, हिरव्या डोळ्यात अग्नी फुलणे, पाकोळीसारखी टपकन खाली पडणे, उन्मळलेली केळ, चेहरा नाना फडणविसांसारखा लांब करणे इत्यादी प्रतिमांचा वापर सदर कथांतून केलेला दिसतो.

**३) वाक्यप्रचार-**

१) "रान बहिऱ्या आणि भिंत आंधळ्या होणे." [२९]

२) "चेहरा नाना फडणविसांसारखा करणे." [३०]

**४) म्हणी-**

"मान सांगावा जगात अपमान सांगावा मनात ." [३१]

"भिकेची हांडी कधी शिंक्याला चढत नाही." [३२]

अशाप्रकारे प्रतिमा, वाक्यप्रचार, म्हणी यांनी ही भाषा सजलेली आहे. त्यामुळे या सर्वच कथा वाचनीय झाल्या आहेत. पात्राच्या भावाभिव्यक्तीला साजेल अशीच भाषा वापरल्यामुळे कृत्रिमता जाणवत नाही. भाषेत सहजपणा जाणवतो.

## २) निवेदन शैली

निवेदन करत असताना वाचकांशी थेट संवाद साधला जातो. उदा. हारजीत (देवकाठी) मधील पुढील उतारा पाहा.

"आम्ही मूळचे कोकणचे. रत्नागिरी जिल्ह्यातले. खेड तालुक्यात आंबवलीच्या पलीकडे तीन मैलावर आमचं गाव. 'देवाचा माळ' नावाचं छोटं गाव. वडील लहानपणी शिक्षणासाठी बाहेर पडले ते तिकडे कधी

परत गेलेच नाहीत. आम्ही खानदान मराठा, माझी आई ब्राह्मण, शिंदे-साठे विवाह त्याकाळी फार गाजला म्हणे. बाबांनी असा विवाह केला आणि गावाकडची उरली सुरली मुळं तोडून टाकली.''[३३]

निवेदन करताना उपमा, दृष्टांत, म्हणी, वाक्यप्रचार यांचा वापर केल्यामुळे निवेदन हृदयाला भिडते व परिणामकारक होते.

उदा. हारजीत (देवकाठी) ''मान सांगावा जगात, अपमान सांगावा मनात.'' उदा. भूक (देवकाठी) या कथेत विनयचे चुलते विनयला म्हणतात, ''भिकेची हांडी कधी शिंक्याला चढत नाही.''

निवेदन करताना भूतकाळातून वर्तमानकाळाकडे वळत असल्याची जाणीव त्यांच्या कथेत होते.

उदा. धुके (देवकाठी) या कथेतील सुसान हिला सौंदर्य स्पर्धेत मिळालेली बक्षिसे, फोटो पाहत असताना हे सर्व काही फोल आहे याची जाणीव होते. हा आशय पुढीलप्रमाणे मांडला आहे. '' हा अल्बम. कपाटात ठेवलेली कात्रणांची फाईल. शोकेसमध्ये मांडून ठेवलेली मेडल्स, कप्स आणि ट्रॉफीज, तो मोठा कप. कुणा अरब राष्ट्रातल्या एका राजाच्या हातून मिळालेला कप. एकेकाळी चकचकीत दिसणारा, अस्सल चांदीचा म्हणून दिला गेलेला हा कप. आता वरचे गिलिट उडाल्यामुळे तो विरूप दिसत होता. (हाय दि हेल..........(सुसान, दाऊशॉल्ट नॉट स्वेअर)..........[३४]

खालील उदाहरणही या दृष्टीने महत्त्वाचे आहे. आनंदी आनंद गडे (देवकाठी). मनगट मोडल्यावर डॉक्टरांकडे गेल्यावर इवलेसे मनगट मोडले. ते दुरुस्त करण्याबद्दल आपण बिल काय देणार या

विचाराने प्रोफेसर लाजले. त्यावेळी भाषेत प्रतिमा वापरतात.

"मूठभर पोहे घेऊन कृष्ण भेटीला जाणाऱ्या सुदामासारखा लाजलो." [३५]

## ३) संवाद शैली

अनंत मनोहरांच्या कथेत पात्रांचे संवाद खटकेबाज आहेत. प्रसंगानुरूप पात्रांचे होणारे संवाद सरळ सरळ असतात. छोटी छोटी वाक्ये वापरून संवाद घडविले आहेत. ते परिणामकारक होतात. त्यात प्रासादिकता येते. उदा. देवकाठी ( देवकाठी). बापू व योगेश यांच्यातील संवाद:

"खरी गोष्ट तीच विसरण्याचा यत्न करतोय मी." "होय ना ? दु:ख इतरांना सांगावं म्हणजे ते हलकं होतं. योगेश, या भवसागरात दु:ख, संकटे, जरा, मरण चुकत नाहीत कोणाला; पण आपण माणसं एकमेकांच्या दु:खात सहभागी होऊ शकतो." "आणि तुमचा तो पंढरीराया ?" "तो तर कर्ता- करविता. त्याच्या इच्छेवाचून या घडीभरीच्या वस्तीत काही घडतं का ?"

"तोच मला प्रश्न पडलाय, बापू. या जगात मुळातच देव आहे का ? आणि जर असलाच तर तो न्यायाने हे जग चालवतो का ? अंहं, माझं नीट ऐका बापू आणि मग सांगा उत्तर, माझं नाव योगेश दिवाकर भोबे.........." [३६] उदा. - 'अखेरची भूमिका' (देवकाठी) या कथेतील देवदत्त व शरयू यांचा संवाद.

"मातृत्व हा स्त्रीचाच हक्क आहे आणि शिवाय मघा तू म्हणालीसच की या अफाट जगात तुझं कोणी नाही ! God repays for that.

तुझं हे अपत्य तुझी काळजी घेईल."

यावर शरयू म्हणते,

''पण मी जगाला काय उत्तर देऊ ? जगापुढं कसं तोंड दाखवू ? जग जेव्हा माझ्या तोंडावर थुंकेल तेव्हा कर्ता म्हणून तुम्ही पुढं थोडेच येणार आहात ?''

''मी ?''

''मग कोण ?''

''माझा काय संबंध ? पितृत्व हे नेहमीच संशयास्पद असतं, शरयू.''[३७]

काही संवादांत पाल्हाळीकता आल्याचे जाणवते.

उदा. विरले स्वप्न मराठी एक (देवकाठी)

आयटक प्रतिनिधी ज्यावेळी घाटपांडेंना भेटायला येतो त्यावेळीचा संवाद:

''अहो, पण संप व्हावेतच का मुळी ?''

'' का ?'' तो कडू हसला. ''होतात, संप होतात. मालकांच्या चुकीमुळे होतात संप. मला असं सांगा, कामगार कामाच्यावेळी झोपला तर तुम्ही त्याला शासन करणार का ?''

''अलबत करणारच .''

''तो उशिरा आला, तर खाडा धरणार ?''

''अर्थात. धरावाच लागेल.''

''तो मंद काम करू लागला, तर दम द्याल ?''

''सडकून दम देईन. सोडणार नाही.''

''त्यानं उद्धटपणा केला तर ?''

''लाथ घालीन त्याला.''

''यंत्राचं नुकसान केलं जाणून-बुजून.''

''त्याच्या पगारातून पैसे कापीन.''

''घातपात केला....''

''खटला भरीन त्याच्यावर.''

''तुम्हांलाच दमदाटी केली........''

''काढून टाकीन त्याला.''[३८]

वरील उदाहरणावरून लेखकाची संवादात्मक शैली लक्षात येईल. त्यामुळे कथेत रंगत येते. कथा रूक्ष वाटत नाही. प्रसंग आणि घटना यांचे प्रत्यक्ष वर्णन केल्यामुळे सर्व कथा आपणासमोर घडत आहे असे वाटते. वाचक भूतकाळात सहज जातो. कथा तल्लीन होऊन वाचली जाते. वाचनीयता हे अनंत मनोहर यांच्या कथेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

### ४) वातावरण निर्मिती-

अनंत मनोहर यांनी कथेला पूरक अशी वातावरण निर्मिती कथेत केली आहे. पात्रे ज्या ठिकाणी राहतात, वावरतात त्या ठिकाणचे स्थलवर्णन हे पर्यायाने येतेच. शाळेतील वातावरणाचे चित्रण 'मोठ्या बाई' (देवकाठी) या कथेत आले आहे. ''बरोबर दहा पंचेचाळीसला मोठ्या बाई आल्या. आठवीतल्या पोरी अजून बाहेर खेळत होत्या. नववीच्या पोरी मोठ्या व्हरांड्यातून हमामा घालीत होत्या. बाई दिसल्याबरोबर पोरींनी जिभा चावल्या. डोळे मोठे केले. ''अय्या, बाई आल्या गं,'' ए चला की प्रार्थनेची घंटा होईल.''[३९] चाळीतले वातावरणाचे चित्रण 'पडदा' (देवकाठी) या कथेत आले आहे. ''घरातला

गबाळेपणा, फुटपाथवर विकत घेतलेल्या विजोड कपबश्या, रेशनवर घेतलेल्या कापडाचे दाराला व खिडक्यांना केलेले पडदे, सामानाने भरलेल्या खोल्या, अमृतांजनाचा घरात भरलेला वास, चाळीतल्या लोकांचे उंच आवाजातले बोलणे, जे आपल्याला हवेसे वाटते पण परवडत नाही.'' ४०

'आय शॅल फॉर यू' (बिल्वपत्र) या कथेत जेलमधील वातावरण रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे.''फादर जॉन गेटशी येताच कासम शरीफने चपळाईने बिडी बिझवून तुरुंगाचे मोठं दार उघडले. दाराचा कर्रकर्र असा आवाज झाला. बागेत काम करणाऱ्या सक्तमजुरीच्या कैद्यांनी दाराकडे पाहिले. पंचविशीचा पंढरी जाधव खुरप्याने तण काढत म्हणाला, ''आजपासून पंधरा दिवसांनी हा दरवाजा माझ्यासाठी असाच उघडेल. छूट जाएगा यह पंछी. तुला सांगतो दोस्त इथून गेल्या गेल्या मी प्रथम गावी पळणार. माझ्या गावी पोचताक्षणी पहिले छूट नदीत उतरणार. माझ्या गावी कृष्णेचा डोह आहे. भर उन्हाळ्यातही डोहात दोन पुरुष पाणी असतं यारं म्हणजे बघ. अंघोळ करून, नदीकाठचा शंकराच्या देवळात जाणार.........'' ४१ काही वेळा वाचक कथेतील वातावरणाशी एकरूप होऊन जातो. आनेगावचे वर्णन केले आहे. ग्रामीण जीवनाचे चित्रण या कथेत आलेले आहे.

''आनेगावाला धरून असलेल्या डोंगराच्या उतारावर आनेगावकरांनी शेताशेतातून झाडाचे तोडलेले कवळे आणून टाकले. हा राब त्यांनी इवल्या इवल्या तुकड्यांतून पसरला. त्यावर रानशेण्या मोडून विखुरल्या. राब पेटवले. वाऱ्याबरोबर पेटत्या डोंगराचा धूर आनेगावात शिरला.

आकाशापर्यंत गेला. वाऱ्यावर तरंगत दशदिशांना पांगला. धूर आणि राबाचा जळकट वास यांनी आसमंत भरलं. आकाशातून धरतीला ओतल्या जाणाऱ्या अग्नीत पेटत्या डोंगराच्या धगीची भर पडत राहिली. घरांच्या परसातून आळीवारकी करण्यासाठी आनेगावात घरटी दोन-चार राब पेटले. सगळं आनेगाव जसं धुरानं, धगीनं भरून गेलं.'' ४२

त्या त्या स्थळकालाचे वर्णन केल्यामुळे वातावरण निर्मिती चांगली होते. अनंत मनोहरांच्या सर्वच कथांमध्ये अशी वातावरण निर्मिती पाहवयास मिळते.

### ५) वर्णन शैली-

अनंत मनोहरांच्या कथेतून आलेली वर्णने परिणामकारक आहेत. प्रसंगाचे किंवा व्यक्तीचे चित्रण करताना त्यांच्या ठिकाणची विशिष्ट वर्णन शैली दिसून येते. तरीही डोरिथी (देवकाठी) या कथेत डोरिथीचे वर्णन आले आहे. ते पुढीलप्रमाणे :

''ही डोरिथी. कशी गोड किती लाघवी. वस्त्रांची निवड करावी ती डोरिथीने. तिचे कपडे तरी कसे ? जाणवावेत, पण भडकपणाने दिसून नयेत असे. अशी जवळून गेली तर स्नो- फेसपावडर आणि सेंट यांच्या मंदतरल वासांची सिंफनी जाणवावी, पण फक्त जाणवावी. बोटांची नखे, नेलपॉलिशची करामत पाहत राहवे. कधी शिष्टाचार चुकणार नाही, कधी आवाज चढणार नाही, क्लाएंट किती हटवादी असला तरी हिच्या स्वरातला गोडवा कमी होणार नाही.'' ४३ चाळीतील घरांची रचना कशी असते याचे वर्णन 'शर्त' (देवकाठी) या कथेत सुरुवातीलाच आले आहे. ते प्रत्यक्ष व परिणामकारक आहे. उदा. ''एक

दुमजली बस धडधडत गेली. जरा हात लांब केला असता तर बसच्या वरच्या मजल्यावर बसलेल्या प्रवाशांशी हस्तांदोलन करता आले असते. एवढ्या जवळून बस गेली.''[४४]

बिल्वपत्र (बिल्वपत्र) या कथेत कृष्णेला मोठा पूर आला होता. त्यात महेश पोहायला जातो. त्यावेळी लेखकाने केलेले वर्णन त्याच्या वर्णनशैलीचा उत्कृष्ट नमुना म्हणता येईल. उदा. ''आठ दिवस त्या भागात नुसती संततधार पडत होती. रानातली श्वापदं आणि बिळातली जनावरेही कासावीस झाली होती. महेश त्याच्या मित्रांसह महापूर पाहयला गेला असताना कृष्णेच्या काठी असलेल्या कारंजीच्या मध्यम उंचीच्या झाडावर त्याला मनगटापेक्षा जाड, तळहातापेक्षा मोठा फडा असलेला दीस वाव लांबीचा काळा नाग दिसला. जीव वाचवण्यासाठी तो झाडावर चढला होता. त्याला पाहून महेशला वीरश्री चढली.''[४५]

काही वेळेला वर्णन करताना वेगवेगळ्या प्रतिमांचा वापर करून वर्णने केली आहेत. इरप्पाला न आवडणाऱ्या काळ्या कुरूप बायकोचे वर्णन असे केले आहे. 'हाक' (बिल्वपत्र) ''घोरपड आयुष्याला चिकटली. काळी आणि कुरूप. बुद्धीने मंद. एकेक गोष्ट दहा दहादा बजावली तरी डोक्यात न शिरणारी. बथ्थड, हेकट, काही समजून न घेणारी. तिला कधी नव्हे तो मुलगा झाला तोही तिच्यासारखा काळा नि कुरूप.''[४६] या कथेत सापाचे वर्णन करताना अशाप्रकारे केले आहे: ''त्याने झुडपाच्या छायेत आसरा घेतला. लांबून पाहिले असते तर एखाद्याला वाटले असते येथे राहाटाचा दोर कोणीतरी गुंडाळा करून ठेवलाय.''[४७] याच कथेत हुव्वाप्पाला साप चावतो. त्यावेळीचे वर्णन

करताना, ''उन्मळलेल्या केळीप्रमाणे हुव्वाप्पा खाली पडला. '' असे वर्णन करतात. अशा निसर्गातील आणि मानवी जीवनातील उपमा, प्रतिमा, उदाहरणे देऊन वर्णन केल्यामुळे ते प्रत्यक्षदर्शी व वास्तवदर्शी झाले आहे.

तोल रेघ (बिल्वपत्र) या कथेत पावसाचे वर्णन करताना ''तलखी विलक्षण वाढली. एक दिवस आभाळाचा रंग बदलला. सूर्यास्त होण्यापूर्वी आभाळात काळे हत्तीएवढे ढग संथपणे समुद्राकडून सह्याद्रीच्या रोखाने तरंगत येत राहिले आणि अचानक चिंचेची नाजूक पाने सळसळली. बघता बघता गरम वाफेप्रमाणे वाऱ्याचा झोत आला. आभाळात विजेचा आसूड फटकारला गेला. मेघांचा प्रचंड गडगडाट झाला आणि सडसड आवाज करीत पावसाचे थेंब जमिनीकडे झेपावले. पुढच्या क्षणी अपार वृष्टीला प्रारंभ झाला. त्याच्या जोडीला क्षणाक्षणाने आकाशात लखलखू लागले. वाऱ्याचे झोत सुटले. झाडांना पिळवटून ते सह्याद्रीशी टकरा घेऊ लागले. तृप्त झालेल्या तापत्या मातीतून मादक सुगंधाचे लोट उठले. झाडाखाली, जमिनीवर दिसू लागलेले मखमली मृगकिडे पानाखाली दडले. पक्षी घरट्यांतून दडून राहिले आणि सारी सृष्टी अमृतवृष्टी झेलत राहिली.'' ४८.

चेहरा (बिल्वपत्र) या कथेत ग्लोरियाच्या मनस्थितीचे वर्णन करताना,

''सिल्व्हर नदीत किनाऱ्याशी खडकांच्या दुबेळवयात उथळ पाण्यात जन्माला आलेल्या माशाने महापुराच्या पाणलोटातून अटलांटिक महासागरात प्रवेश केला तर त्या उसळत्या, हेलावणाऱ्या सागर दर्शनाने तो स्तिमित होईल तशी ग्लोरिया भयचकित झाली होती .'' ४९

वरील सर्व उदाहरणांतून लेखकाच्या वर्णनशैलीची कल्पना येऊ शकेल. अनंत मनोहर यांच्या वर्णनातील कल्पकता मनोहर आहे असे म्हणावयास हरकत नाही. काही ठिकाणी त्यात अतिशयोक्तीही पाहवयास मिळते.

## ६) प्रसंग चित्रण-

प्रसंगाचे चित्रण करताना तो प्रसंग वाचत असताना आपल्या समोर घडत आहे असे वाचकांना वाटते. अनंत मनोहरांच्या सर्वच कथांत हे जाणवत राहते. हुव्वाप्पा साप पकडण्यासाठी जातो आणि त्याच्यावर मृत्यू ओढवतो. या प्रसंगाचे चित्रण असे केले आहे : 'हाक' (बिल्वपत्र) ''भुजंग शेपटीवर उभा राहिला. हुव्वाप्पाने त्याच्या जवळ येत येत हातातली काठी वरखाली केली. त्यानुसार भुजंग शरीराला झोले देत होता. योग्य क्षण साधून हुव्वाप्पाने काठीचा हूक भुजंगाच्या फण्यापासून वीतभर खाली लावण्याचा प्रयत्न केला. त्याचा हा पवित्रा भुजंगाने ओळखला. त्याने सळकन शरीराला झोला दिला आणि तो पुढे झेपावला. त्याने हुव्वाप्पाच्या शरीराला विळखे घातले आणि त्याला कडकडून दंश केला. त्याच्या पोकळ दातांतून विषधार हुव्वाप्पाच्या रक्तात रिती होत राहिली. त्याचे विळखे अधिकाधिक घट्ट होत राहिले. हुव्वाप्पाचा श्वास कोंडत गेला. रक्ताच्या गुठळ्या होऊ लागल्या. तरी भुजंग त्याला डसतच होता. उन्मळलेल्या केळीप्रमाणे हुव्वाप्पा खाली पडला. बघता बघता त्याच्यात विष भिनत गेले.'' [५०] ही प्रत्यक्ष वर्णन शैली परिणामकारक वाटते.

सोनाच्या आईला साप चावतो. त्यावेळचा प्रसंग लेखकाने कसा

वर्णन केला आहे पाहा- ''सोनाची आई सोनाला बरोबर घेऊन वावोशी गावात चार घरे फिरून आली होती. भर दुपारची वेळ. सोन्याच्या रंगाचे ऊन पडले होते. त्या उन्हात शेते, कमरेपर्यंत वर आलेली भाते कशी साजरी दिसत होती. सोनाला थांबायला सांगून तिची आई शेताच्या बांधाआड गेली. तिने खाली पाय टाकला त्याक्षणी तिच्या पायाला जबरदस्त विळखा पडला होता. भयाने तिची बोबडी वळली. नागाने तिला कडकडून दंश केला. नाग उलटापालटा झाला आणि सणाणत निघून गेला होता. सोनाची आई लटपटत कशीबशी वर आली.'' [५१]

सोना जेव्हा जीव देण्यासाठी जाते त्यावेळचे चित्रण, ''तिने रुळांना कान लावले. गाडीच्या चाकांचा लयबद्ध आवाज ती ऐकत राहिली.

''गाडी वळणाशी आली. प्रकाशाचा झोत चुकवण्यासाठी ती बाजूला झाली. गाडीने वळण घेतले. आता गाडी तिच्या रोखाने येऊ लागली. अर्ध्यामैलावर पुन्हा वळण. गाडीने पुन्हा वळण घेतले. त्याचक्षणी सोनाने धावत्या गाडीपुढे देह झोकून दिला.''

''एक किंकाळी अस्फूट उठली न उठली.'' [५२]

**७) व्यक्तिरेखाटन-**

अनंत मनोहरांच्या कथांतून अनेक ठळक अशा व्यक्तिरेखा पाहयला मिळतात. काही चांगल्या वृत्तीच्या तर काही स्वार्थी, लबाड वृत्तीच्या व्यक्तिरेखांचे चित्रण या कथासंग्रहांतून केले आहे. स्त्री व्यक्तिरेखा रंगविताना त्यांच्या कथांतील स्त्री ही रसिक आहे असे दिसते. कमालीचा हळवेपणा तिच्यात आहेत. संकटाला सामोरे जाण्याची तिची

तयारी असते. अशा खंबीर स्त्रियांची व्यक्तिरेखा ते रंगवताना दिसतात. ढाई अक्षर (देवकाठी) या कथेतील शमा रसिक आहे. घरखर्चासाठी नोकरी करते. प्रमोद पंडितविषयी तिला सहानुभूती आहे. म्हणून ती त्याला जॉबच्या नवीन नवीन जाहिराती देते. शमाच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना असे केले आहे, "तेव्हापासून त्याच्या लक्षात आले होते की, ही मुलगी अतिशय साधी आहे. सुरेख असूनही साधी आहे किंबहुना आपल्याकडे चटकन कोणाचे लक्ष जाऊ नये अशी खबरदारी ती घेत असावी. तिचे कपडे मंद इंग्लिश कलरचे होते. केशरचना साधी होती.''

मोठ्या बाई (देवकाठी) चे व्यक्तिरेखाटन केले आहे.''बाई दिसायला सावळा रंग, पाणीदार डोळे, उंच सडपातळ, तरतरीत होत्या. सुलोचना बाईंची आर्थिक परिस्थिती नसतानाही त्या शाळा शिकतात. घराची जबाबदारी स्वीकारतात. लहान बहीण भावांची लग्ने लावून देतात. शेवटी मात्र एकट्या राहतात.'' अशा कणखर स्त्रीचे चित्रण या कथेत आले आहे.

बिल्वपत्र (बिल्वपत्र) आबा महाराजांची व्यक्तिरेखा रेखाटली आहे.

''पावणेसहा फूट उंची, डोळे मोठे- लालसर, रंग काळा, देह भक्कम, कमरेला विटका, जुना पितांबर, खांद्यावरून जाड काळे कळकट जानवे , तोंड विडा खाल्ल्यामुळे लाल, नजर उग्र, मादक, त्या नजरेत सदैव कसला तरी हिशेब मनात चालू असल्याचा भाव असे.''[५३] गर्विष्ठपणाची भावना त्यांच्याकडे होती. घराची परंपरा, सत्ता दुसऱ्याकडे

जाऊ नये असे आबा महाराजांना वाटे. मुलांच्या मनाचा विचार न करणारे आबा महाराज या कथेत चित्रित केले आहेत.

'राँग नंबर' (बिल्वपत्र) या कथेतील गौरी शहा हिचे व्यक्तिचित्रण कथेत आले आहे. गौरी शहा ही वकिल आहे. तिच्या भूतकालीन जीवनात शोकात्मिका घडली आहे. तरीही ती न खचता आपला मार्ग शोधते. गौरी शाळेत हुशार होती पण तिच्या वडलांनी तिचे लग्न एका श्रीमंत घराण्यात करून दिले. तेथे तिला हेटाळणीशिवाय काहीच नशिबीयेत नाही. तिची व्यक्तिरेखा रेखाटली आहे ते पुढीलप्रमाणे :''तिच्या व्यक्तिमत्त्वास धारदारपणा होता. तिच्या भाषणात, वागण्यात, बोलण्यात आक्रमकता असे. स्त्रीरूपी अहंकार आणि स्त्रीची परवशता याबद्दल तिला चीड होती. तिची मते कडवट बनली होती. तिच्या लेखातून हा कडवटपणा व्यक्त होत असे. स्त्रीमुक्ती हा शब्दही न उच्चारता जेथे शक्य असेल तेथे ती आचरण करून दाखवित असे.'' ५४

'चेहरा' (बिल्वपत्र) या कथेतील ग्लोरियाचे व्यक्तिचित्रण रेखाटले आहे. ''तिचा चेहरा नितळ होता. त्वचा अतिशय मुलायम होती. डोळे पॅसिफिक महासागराच्या पाण्यासारखे निळे, नाक रोमन लोकांसारखं धारदार, आईस्क्रिम आणि चॉकलेटची आवड असूनही दात स्वच्छ , चकचकीत, बारीक, सारख्या आकाराचे व उंचीचे कानांच्या पाळ्या तलम, जवळजवळ पारदर्शक, लिपस्टिकची गरज पडू नये असे लाल ओठ, नाजूक, लहानसर जिवणी, उंची ५ फूट ७ इंच, पाय सडसडीत व लांब, हाताची बोटे लांब, निमुळती, नखे गोलाकार, कंबर लहान, देह सडसडीत, चेहरा सतेज आणि हसरा. आवश्यक मापे बरोबर. योग्य

तेथे भरदारपणा असूनही देह सडसडीत होता. तारुण आणि आरोग्य यांचे तेज चमकत होते. '' [५५]

**समारोप-**

सामाजिक घडामोडींचा परिणाम समाजावर होतो आणि समाजाचा परिणाम साहित्यावर होतो. समाजातील वेगवेगळे अनुभव, वृत्ती प्रवृत्ती सामाजिक परिस्थितीचे अवलोकन करून अनंत मनोहरांच्या कथा साकार झाल्या आहेत. त्यांच्या कथेचे विषय वेगवेगळे आहेत. या वेगळेपणामुळेच त्यांच्या कथेत तोचतोचपणा राहत नाही. अनंत मनोहरांच्या कथेत वास्तवता येते. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक बदलांमुळे होणारे समाजातील बदल याचे सूक्ष्म अवलोकन अनंत मनोहरांच्या कथेत येते. माणूस म्हटले की, सुख- दु:खे आलीच. 'देवकाठी' या कथेत सर्वसामान्य माणसाचे कष्टप्रद जीवन व त्यातून निर्माण झालेले त्याचे स्वत:चे तत्त्वज्ञान याचे मार्मिक दर्शन घडते. या कथेतील योगेश त्याच्या दु:खाचा जाब विचारण्यासाठी पंढरपूरला जातो. दु:खाने पिचलेल्या माणसांचे चित्रण समर्थपणे अनंत मनोहर करतात. 'बिल्वपत्र' या कथेतील गणेशला इच्छा नसताना मठाधिपती म्हणून बसविले जाते. त्याचा होणारा मानसिक व भावनिक कोंडमारा या कथेत दिसतो. गणेशचे वडील आबा महाराज यांच्या विकृत स्वभावावर प्रकाश टाकला आहे. समाजातील आर्थिक विषमता हे दु:खाचे कारण आहे. 'पाश' (बिल्वपत्र) या कथेतील बापू हे मिल्ट्रीतून सेवानिवृत्त झाले तरी दुसरीकडे नोकरी करायला जातात.

चाळ संस्कृतीचे चित्रण, मध्यमवर्गीय लोकांचे प्रश्न मांडण्याचा

प्रयत्न त्याच्या कथेत केला आहे. 'पडदा' (देवकाठी) 'दास' स्त्री-पुरुषांच्या संबंधावर प्रकाश टाकला आहे. 'अखेरची भूमिका' (देवकाठी) मधील शरयू व तिला फसविणारा देवदत्त याचे उत्तम उदाहरण होय. 'ढाई अक्षर' (देवकाठी), राँग नंबर (बिल्वपत्र), 'तर ही डोरिथी' (देवकाठी) या कथांतून प्रेमजीवन रेखाटले आहे. प्रेमासारखा नाजूक विषयसुद्धा ते इतक्या नाजूकपणे जपतात.

अनंत मनोहरांच्या कथेत येणाऱ्या स्त्रिया ह्या उच्चशिक्षित आहेत. नशिबाला दोष देत नाहीत किंवा रडत बसणाऱ्यांपैकी नाहीत. तर त्या स्वकर्तृत्वावर उभ्या राहताना दिसतात. कुटुंबाचे पालन पोषण करतात. उदा. 'मोठ्या बाई' (देवकाठी) मधील सुलोचनाबाई, 'ही वाट एकटीची' (देवकाठी) मधील सोना खंबीर नेतृत्व करणाऱ्या आहेत. अनंत मनोहरांच्या कथेतील स्त्रिया जितक्या सोशिक आहेत तितक्याच त्या बेछूट वागणाऱ्या आहेत. चेहरा, धुके (देवकाठी) सुसान व चेहरा (बिल्वपत्र) या कथेतील ग्लोरियाचे चित्रण केले आहे.

स्त्रियांची वेगवेगळी दु:खे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. 'वाळवण' (देवकाठी) या कथेतील रमाबाई नवऱ्यासाठी स्वत:च्या जीवनाचे वाळवण करते.

अनंत मनोहरांनी कैदीजीवन, सर्पजीवन ह्या दोन्ही भिन्न असणाऱ्या जीवनांवरही लेखन केले आहे. कैदी जीवनावर 'आय शॉल प्रे फॉर यू' (बिल्वपत्र) या कथेतील टोनीची मानसिकता रेखाटली आहे. टोनीला फाशीची शिक्षा होणार या भीतीने त्याचे मानसिक संतुलन बिघडते. याचे यथार्थ चित्रण ते करतात.

निसर्ग आणि मानव याचे नाते अतूट आहे. निसर्गाबद्दल ओढ त्यांच्या कथेत दिसते. सर्वांवर त्यांच्या दिनक्रमावर कथा लिहिल्या आहेत. 'कालिया', 'तोलरेघ' (बिल्वपत्र).

अनंत मनोहरांच्या कथेत वास्तवता आहे. पोटासाठी भटकंती (बिल्वपत्र) या कथेत प्राध्यापकाची होणारी कुचंबणा चित्रित केली आहे. कामगार- मालक संबंध, त्यांच्यातील वाद याचे चित्रण 'झुंज' (बिल्वपत्र) या कथेत चित्रित केले आहेत. समाजातील प्रत्येक घटकाला अनुसरून त्यांनी कथा लिहिल्या आहे. 'देवकाठी 'व 'बिल्वपत्र' या कथासंग्रहातून, आशयातून आपल्या लक्षात येते.

**संदर्भ-**


१. मनोहर अनंत, : 'देवकाठी', 'मेघदूत प्रकाशन, प्रकाशन क्रमांक २, प्रथमावृत्ती सप्टेंबर १९८४, पृ. ८.

२. उ. नि : पृ. ११.

३. उ. नि : पृ. १५.

४. उ. नि : पृ. २१.

५. उ. नि : पृ. २६.

६. उ. नि : पृ. ३२.

७. उ. नि : पृ. ३२.

८. उ. नि : पृ. ६३.

९. उ. नि : पृ. ७३.

१०. उ. नि : पृ. ८१.

११. उ. नि : पृ. १०२.

१२. उ. नि : पृ. १२८.

१३. उ. नि : पृ. १३४.

१४. उ. नि : पृ. १४४.

१५. मनोहर अनंत, : 'बिल्वपत्र', सुयोग प्रकाशन, प्रथमावृत्ती १५ डिसेंबर १९९१, पृ. ५.

१६. उ. नि : पृ. ७.

१७. उ. नि : पृ. १०.

१८. उ. नि : पृ. १३.

१९. उ. नि : पृ. ७५.

२०. उ. नि : पृ. ९०.

२१. उ. नि : पृ. ९२.

२२. उ. नि : पृ. ९५.

२३. मनोहर अनंत, : 'देवकाठी', मेघदूत प्रकाशन, प्रकाशन

क्रमांक २, प्रथमावृत्ती सप्टेंबर १९८४, पृ. ५५.
२४. उ. नि : पृ. ५७.
२५. उ. नि : पृ. २७.
२६. मनोहर अनंत, : 'बिल्वपत्र', सुयोग प्रकाशन, प्रथमावृत्ती १५डिसेंबर १९९१, पृ. १०८.
२७. उ. नि : पृ. १११.
२८. उ. नि : पृ. ११२.
२९. मनोहर अनंत, : 'देवकाठी', मेघदूत प्रकाशन, क्रमांक २, प्रथमावृत्ती सप्टेंबर १९८४, पृ. ९३.
३०. उ. नि : पृ. १४७.
३१. उ. नि : पृ. २१.
३२. उ. नि : पृ. १२८.
३३. उ. नि : पृ. १६.
३४. उ. नि : पृ. ७५.
३५. उ. नि : पृ. १४७.
३६. उ. नि : पृ. १०.
३७. उ. नि : पृ. ४१.
३८. उ. नि : पृ. १४२, १४३.
३९. उ. नि : पृ. ६८.
४०. उ. नि : पृ. ४९.
४१. मनोहर अनंत, : 'बिल्वपत्र', सुयोग प्रकाशन, प्रथमावृत्ती १५ डिसेंबर१९९१, पृ. २८.
४२. उ. नि : पृ. १०७.
४३. मनोहर अनंत , : 'देवकाठी', मेघदूत प्रकाशन, प्रकाशक क्रमांक २, प्रथमावृत्ती सप्टेंबर १९८४, पृ. ८२,८३.
४४. उ. नि : पृ. ११६.

४५. मनोहर अनंत, 'बिल्वपत्र', सुयोग प्रकाशन, प्रथमावृत्ती १५ डिसेंबर १९९१, पृ. ८.

४६. उ. नि : पृ. ९०.

४७. उ. नि : पृ. ८९.

४८. उ. नि : पृ. ११०.

४९. उ. नि : पृ. ४७.

५०. उ. नि : पृ. ९५.

५१. मनोहर अनंत, 'देवकाठी', मेघदूत प्रकाशन, प्रकाशन क्रमांक २, प्रथमावृत्ती सप्टेंबर १९८४, पृ. ९९.

५२. उ. नि. : पृ. १०५.

५३. मनोहर अनंत, 'बिल्वपत्र', सुयोग प्रकाशन, प्रथमावृत्ती १५ डिसेंबर १९९१, पृ. ४

५४. उ. नि : पृ. १८.

५५. उ. नि : पृ. ४१.